cmyk

## संपादकीय

### लोकशाहीच्या संकेतांना आव्हान देणे चुकिचे

वक्फ दुरुस्ती विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले असले, तरी त्या विरोधातील आवाज थांबलेला नाही. बहुतांश राज्यांत निवडक ठिकाणी निदर्शने केली जात आहेत. पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार आणि जाळपोळ सुरू आहे. राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी एक निवेदन जारी केले आहे. ते भयानक आहे. आपण बंगालमध्ये वक्फ कायदा लागू करू देणार नाही, असे ममता यांनी म्हटले आहे. ते गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. संसदेत आणि संसदेबाहेर काँग्रेसनेही वक्फ कायद्याला विरोध दर्शवला आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३४८ | रविवार, दि.१३ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षपदी विनीत जोशी

नवी दिल्ली केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने उच्च शिक्षण विभागाचे विद्यमान सचिव विनीत जोशी यांना अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. त्यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. युजीसीचे माजी अध्यक्ष जगदीश कुमार यांच्या निवृत्तीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. जगदीश कुमार यांनी फेब्रुवारी २०२२ पासून यूजीसीचे अध्यक्ष म्हणून कार्य केले. पूर्णवेळ अध्यक्षांची नियुक्ती होईपर्यंत किंवा पुढील आदेश जारी होईपर्यंत विनीत जोशी यूजीसी अध्यक्ष म्हणून कर्तव्य बजावतील. विनीत जोशी १९९२ च्या बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. त्यांचा जन्म २ नोव्हेंबर १९६८ रोजी उत्तर प्रदेशात झाला. ते मणिपूर केडरच्या बॅचचे आहेत आणि त्यांनी देशाच्या शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

# कृषी विभागाच्या योजनांसाठी १५ एप्रिलपासून शेतकरी ओळख क्रमांक बंधनकारक

**पुणे । पतिनिधी**

**कृषी विभागाच्या योजनांसाठी १५ एप्रिलपासून शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य असणार आहे. शेतकऱ्यांना या ओळख क्रमांकाशिवाय कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. अन्यथा शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ १५ एप्रिलपासून घेता येणार नाही.**

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात एकूण शेतकऱ्यांची १ कोटी ७१ लाख संख्या आहे. यापैकी ९१ लाख शेतकऱ्यांचा शेतकरी ओळख क्रमांक तयार करण्यात आला आहे. म्हणजे ६० ते ६५ टक्के शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. परंतु अद्यापही मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली नाही, असंही कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. शेतकरी जवळच्या सीएससीवर जाऊन ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करू शकतात. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकरले जात नाही. सीएससी चालकांना एका अर्जासाठी १५ रुपये सरकारमार्फत दिले जातात. त्यामुळे शेतकऱ्यांनी सीएससी चालकांना शुल्क



देऊ नये, असे कृषी विभागाने सांगितले आहे. राज्यात विविध जिल्ह्यात अनेक ठिकाणी सीएससी चालक शेतकऱ्यांकडून १०० ते १५० रुपये नोंदणीसाठी घेत आहेत. याबद्दल शेतकऱ्यांनी तक्रार केली आहे. परंतु अद्यापही या सीएससी चालकांवर कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची लूट होत असल्याचं शेतकरी सांगत आहेत. कृषी विभाग मात्र नोंदणीसाठी शुल्क देऊ नये, असं आवाहन करत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. राज्य सरकारने कृषी विभागाला शेतकऱ्यांची ओळख क्रमांक अनिवार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यासाठी कृषी विभागाचे सर्व पोर्टल, संकेतस्थळ आणि ऑनलाईन प्रणालीत समन्वय साधण्याच्या सूचना केल्या आहेत. तसेच सर्व बाबी ॲग्रीस्टॅकशी जोडण्याची आदेश जमाबंदी आयुक्तांना दिले आहेत. यामध्ये शेतकरी ओळख क्रमांक आणि त्याचीशी संलग्न डेटाही, पिकांची माहिती जोडण्यात येणार आहे. दरम्यान, केंद्र सरकारने शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनेचा लाभ जलद गतीने देण्यासाठी ॲग्रीस्टॅक प्रकल्प राबवला आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांना पान २ वर



## वक्फ आंदोलनास हिंसक वळण, पिता–पुत्रासह तीन ठार

**मुर्शिदाबाद । वृतसंस्था**

पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबादमध्ये वक्फ कायद्याच्याविरोधात गेले तीन दिवस आंदोलन सुरु आहे. शनिवारी आंदोलनाला हिंसक वळण लागले. हिंसाचारात तीन जणांचा बळी गेला असून मृतांमध्ये पिता– पुत्राचा समावेश आहे. या प्रकरणी आतापर्यंत ११८ जणांना अटक करण्यात आली आहे. हिंसाचारग्रस्त भागात इंटरनेट सेवा खंडीत केली असून संचारबंदीही लागू केली आहे. मुर्शिदाबाद जिल्ह्यातील शमशेरखंड विभागातील जाफराबाद येथे हिंसाचार भडकला. पीटीआयच्या वृत्तानुसार, हत्या झालेल्या पितापुत्रांचे मृतदेह त्यांच्या घरामध्ये मिळून आले. त्यांच्या शरीरावर चाकूने अनेक वार केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. घरी लूटमारही करण्यात आली. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी वक्फ सुधारण विधेयक राज्यात लागू करण्यास ठाम विरोध केला आहे.

# सोनिया–राहुल अडचणीत!

## नॅशनल हेराल्ड प्रकरणी ईडीकडून ७०० कोटींची मालमत्ता जप्तीची कारवाई सुरु



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) कारवाईने नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि त्यांचे पुत्र लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी अडचणीत आले आहेत. त्यांच्याशी संबंधित असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड या कंपनीच्या ७०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या मालमत्तेचा ताबा घेण्याची प्रक्रिया ईडीने शनिवारी (१२ एप्रिल) सुरू केली आहे.**

या मालमत्तांमध्ये दिल्ली, मुंबई आणि लखनौ येथील प्रमुख व महत्त्वाच्या जागांचा समावेश आहे. यामध्ये राजधानी दिल्लीतील बहादूरशहा जफर मार्गावरील हेराल्ड हाऊस या प्रतिष्ठित इमारताचाही समावेश आहे. ईडीने सांगितले की, ही कारवाई मनी लॉन्डरिंग प्रकरणाच्या अनुषंगाने केली जात आहे. ही प्रक्रिया प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग ॲक्ट २००२ च्या कलम ८ आणि मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक (जप्त केलेल्या किंवा गोठवलेल्या मालमत्तेचा ताबा घेणे) नियम २०१३ अंतर्गत करण्यात येत आहे. नॅशनल हेराल्ड हे वर्तमानपत्र प्रकाशित करणारी कंपनी एजेएल ही यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीची आहे. या कंपनीत सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचे प्रत्येकी ३८ टक्के शेअर्स आहेत, ज्यामुळे ते मुख्य भागीदार ठरतात. यातील उर्वरीत सहभागी मोतीलाल व्होरा आणि ऑस्कर फर्नांडिस या काँग्रेस नेत्यांचे निधन पान २ वर

### ईडीची चौकशी व कारवाई

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग ॲक्ट अंतर्गत या व्यवहाराची चौकशी केली. ईडीच्या मते, या व्यवहारात काँग्रेस पक्षाच्या देणग्यांचा गैरवापर करून, बनावट आर्थिक व्यवहार करण्यात आले. ईडीने नोव्हेंबर २०२३ मध्ये दिल्ली, मुंबई व लखनौमधील मालमत्तांवर तात्पुरता ताबा ठेवला होता. आता एप्रिल २०२५ मध्ये ईडीने कलम ८ अंतर्गत ही मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया औपचारिकरित्या सुरू केली आहे.

### काय आहेत ईडीचे आरोप?

१८ कोटी रूपयांच्या बनावट देणग्या दाखवण्यात आल्या. ३८ कोटींचे आगाऊ भाडे घेतल्याचे दाखवले. २९ कोटींच्या जाहिराती दाखवून पैसे उभारले गेले. हे सगळे व्यवहार कागदोपत्री आर्थिक लाभ निर्माण करण्यासाठी केले गेले आणि हे सर्व पैसे गुन्हेगारी आर्थिक व्यवहार म्हणून संबोधले गेले आहेत.

# शेतकरी इतका हतबल का झालाय?

## जयंत पाटील यांचा संतप्त सवाल

**पुणे । प्रतिनिधी**

**नांदेड जिल्ह्यातील शेतकरी हरिदास बोंबले यांनी कर्ज वसुलीच्या तगाद्याला कंटाळून गळफास घेत आत्महत्या केली. तर गव्हाचे बोगस बियाणे निघाल्याने जालना जिल्ह्यातील शेतकऱ्याने रोटावेटर फिरवून उभे पिक जमीनदोस्त केले. महाराष्ट्रातील शेतकरी इतका हतबल कधीच नव्हता. ही काय परिस्थिती निर्माण केली आहे? असा संतप्त सवाल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी उपस्थित केला.**

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील



यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून हे मत व्यक्त केले आहे. जयंत पाटील पुढे म्हणाले की, शेती साहित्य खरेदी करताना शेतकऱ्याला महागाईची झळ बसते, त्याला जीएसटीचा भुर्दंड भरावा लागतो. खताच्या किमती गगनाला भिडल्या आहेत असे ते म्हणाले. कर्जमाफी तर फक्त सत्ताधाऱ्यांच्या शब्दाची वाफ आहे हे शेतकऱ्याने ओळखले आहे. सततचा दुष्काळ, अवकाळी पाऊस ह्याने तर शेतकरी पिचला आहेच, पण सरकारच्या असंवेदनशीलतेने त्याला पान २ वर

## छत्तीसगड–महाराष्ट्र सीमावर्ती भागात ३ नक्षली ठार

**बिजापूर । प्रतिनिधी**

**छत्तीसगड–महाराष्ट्र सीमावर्ती भागातून नक्षलवादी आणि पोलिसांत मोठी चकमक झाली असून दोन्ही बाजूने एकमेकांवर मोठ्या प्रमाणात गोळ्या झाडण्यात आल्याने या चकमकीत ३ नक्षलवाद्यांना कंठस्नात घालण्यात पोलिसांना यश आले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार छत्तीसगड–महाराष्ट्र सीमावर्ती सीमाभागातील बिजापूर जिल्ह्यात ही चकमक झाली. यात नक्षलवाद्यांनी पोलिसांवर गोळीबार केला. तर प्रत्युत्तरादाखल पोलिसांनीही नक्षलवाद्यांना जशास तसे उत्तर दिले. यात ३ नक्षली ठार झाले आहेत. या चकमकीनंतर पोलिसांनी नक्षलवाद्यांचा मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा व स्फोटक पदार्थ जप्त केले आहेत. पोलिसांच्या डीआरजी, एसटीएफ कोब्रा अशा तीन बटालियनने संयुक्तपणे ही कारवाई केली आहे. महाराष्ट्राचा सीमावर्ती भागात असलेल्या इंद्रावती जंगल परिसरात पान २ वर

# आ.संदीप क्षीरसागरांविरोधात पोलिसांत तक्रार

## नगरपरिषदेतील लेखापालास धमकी देत शिवीगाळ केल्याचा आरोप

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून बीडमधील गुन्हेगारी आणि बीड जिल्ह्यातील नेतेमंडळी चांगलीच चर्चेत आहेत. बीडमधील विविध घटनेचे, मारहाणीचे व नेत्यांचे गुंडांसोबतचे व्हिडिओही व्हायरल झाल्याचे पाहायला मिळाले. त्यात, काही दिवसांपूर्वी आमदार संदीप क्षीरसागर यांची ऑडिओ क्लीप



व्हायरल झाली होती. त्यामध्ये, नायब तहसीलदारास त्यांनी धमकी दिल्याचे पाहायला मिळाले. आता, आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडून बीड नगर परिषदेतील लेखापाल पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याला शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी, लेखापाल गणेश पगारे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

आ. क्षीरसागर यांनी धमकी दिल्याची तक्रार करणारे गणेश तुळशीराम पगारे हे बीड नगरपरिषदेतील लेखापाल पदावर कार्यरत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री अजित पवार यांच्यासह पोलीस अधीक्षक पान २ वर

## वक्फ कायदा लागू करणार नाही मुख्यमंत्री ममता बॅनर्जींचा पुनरुच्चार



**कोलकाता। वृतसंस्था**

केंद्र सरकारने लागू केलेला वक्फ कायद्याविषयी आम्ही आमची भूमिका स्पष्ट केलेली आहे. आम्ही या कायद्याला पाठिंबा देत नाही. हा कायदा आमच्या राज्यात लागू केला जाणार नाही, असा शनिवारी (दि. १२) पुनरुच्चार पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोशल मीडिया फ्लॅटफॉर्म वर पोस्ट करत केला. पश्चिम बंगालच्या पान २ वर

# सुप्रीम कोर्टाची राष्ट्रपतींसाठी डेडलाईन!



## विधेयकावर ३ महिन्यात निर्णय घ्यावा लागणार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**सर्वोच्च न्यायालयाने एका पहिल्याच प्रकारच्या निर्णयात राष्ट्रपतींसाठी वेळमर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार राज्यपालांकडून राष्ट्रपतींकडे पाठवलेली विधेयके आता तीन महिन्यांच्या आत राष्ट्रपतींना निकाली काढावी लागतील, असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला.**

८ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकार आणि राज्यपाल यांच्यातील प्रकरणात ऐतिहासिक निर्णय दिला होता. न्यायालयाने म्हटले आहे की, विधानसभेने पाठवलेले विधेयक राज्यपालांनी एका महिन्याच्या आत निकाली काढावे. पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३४.५० क्विंटल | २,००० | ३,०७० | २,५५५ |
| ज्वारी/हायब्रिड: ३७९.०० क्विंटल | १,७५१ | ३,२०१ | २,४०६ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ११.५० क्विंटल | ६,५५० | ७,१५० | ६,९५५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १२९.५० क्विंटल | २,०७० | २,७५१ | २,४८० |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:१७१.५० क्विंटल | ४,४२५ | ४,५११ | ४,४७१ |
| हरभरा: ६.०० क्विंटल | ५,५०० | ५,५९० | ५,५४७ |

# महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून परळीतील सरस्वती नदीची पाहणी

## पंकजा मुंडे यांच्या निर्देशानंतर प्रशासन लागले कामाला

**परळी । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी परळीतील सरस्वती नदीपात्रातील अतिक्रमणे व घाणीचे साम्राज्य पाहून प्रचंड संताप व्यक्त करीत प्रशासनाला धारेवर धरले होते. नगर परिषद प्रशासनाने त्यानंतर तातडीने अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्या आहेत. लगेचच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून तब्बल तीन तास नदीपात्रावर प्रत्यक्ष पहाणी करण्यात आली असून,नगर परिषदेकडे याबाबतच्या आवश्यक कागदपत्रांची मागणीही करण्यात आली आहे.**

परळी शहरातून वाहत असलेल्या सरस्वती नदीची प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या परभणी उपविभागीय अधिकाऱ्यांनी पाहणी केली. यावेळी अधिकाऱ्यांनी नगरपालिकेच्या अनेक विभागातील कागदपत्रे मागवत या नदीसंदर्भात आकडेवारी घेत पाहणी केली. यासंदर्भातील अहवाल वरिष्ठांना पाठविण्यात येणार असून, सध्या या नदीवर संरक्षण भिंत बांधण्याची प्रक्रिया सुरु आहे.



बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या मंदिरासमोरुन शहरात वाहणाऱ्या सरस्वती नदीला सध्या गटाराचे स्वरुप आलेले आहे. नदीच्या दोन्ही बाजुंनी अतिक्रमण झाल्याने पावसाळ्यात नागरिकांच्या घरात पुराचे पाणी शिरते. यातच अंबेवेस भागात नदीपात्रात खोदकाम करुन पात्र अरुंद केले जात असताना पशु संवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी भेट देवून न.प.अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतल्यानंतर अतिक्रमणे हटविण्याच्या हालचाली सुरू झाल्या. पंकजा यांच्या भेटीनंतर आता प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे परभणी येथील उपप्रादेशिक अधिकारी सोमनाथ कुरमुडे यांच्या टीमने परळी नगरपालिकेस भेट दिली. यावेळी त्यांनी सरस्वती नदीचा उगम, शहरातील अंतर, नदीपात्राची रुंदी याबरोबरच परळी शहराला दररोज लागणारा पाणीपुरवठा, शहरात सुरु असलेल्या भुयारी गटार योजनेच्या कामांची सद्यस्थिती माहिती घेत नगरपालिकेचे नगर अभियंता बेंडले यांना सोबत घेत सरस्वती नदीच्या उगमापासून ते परळी नगरपालिका हद्दीपर्यंत अशा पाच कि.मी.ची पाहणी केली. पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# लोकशाहीच्या संकेतांना आव्हान देणे चुकिचे

वक्फ दुरुस्ती विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले असले, तरी त्या विरोधातील आवाज थांबलेला नाही. बहुतांश राज्यांत निवडक ठिकाणी निदर्शने केली जात आहेत. पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार आणि जाळपोळ सुरू आहे. राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी एक निवेदन जारी केले आहे. ते भयानक आहे. आपण बंगालमध्ये वक्फ कायदा लागू करू देणार नाही, असे ममता यांनी म्हटले आहे. ते गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. संसदेत आणि संसदेबाहेर काँग्रेसनेही वक्फ कायद्याला विरोध दर्शवला आहे.

लोकशाहीत विरोध करणे हा अधिकार आहे; मात्र झालेला कायदा पाळणारच नाही हा गंभीर धोका आहे. मुस्लीम समुदायाला जर कायदा खटकत असेल तर सनदशीर मार्गाने निषेध करण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यांच्या संस्था आणि संघटनांच्या प्रतिनिधींनी राज्य आणि केंद्र सरकारशी चर्चा करून आपली भूमिका मांडली पाहिजे. मौलाना मदनी यांनीही तेच सांगितले आहे. मात्र, येथे विषय असा आहे की नेमका विरोध मुस्लीम समुदायाचा आहे की त्यांच्या आडून मतपेढीचे राजकारण करणार्या पक्षांचा आहे? या समुदायातील बहुतांश लोकांनी पूर्वीपासून त्यांचा ज्यांच्यावर विश्वास आहे अशा राजकीय पक्षांच्या भूमिकेला साथ देत निषेधाचा मार्ग पत्करला आहे. यात त्यांचेच नुकसान होण्याची शक्यता अधिक असून त्यांची दिशाभूल थांबवणे आवश्यक आहे. तसेच त्यांना जे काही खटकत असेल त्यावर चर्चा करून त्यांचे समाधान होईल असा मार्ग त्यातून काढणे सरकारचेही काम आहे.

अल्पसंख्याक समुदायाच्या नावाने वर्षानुवर्षे जे राजकारण केले गेले त्यालाच धोका निर्माण झाल्यामुळे कायदा झुगारण्याचे जाहीर करत लोकशाहीच्या संकेतांनाच आव्हान देण्यापर्यंत राजकीय पक्षांची मजल गेली आहे. वक्फच्या नावाने ज्या पद्धतीने राजकीय आणि सामाजिक संघर्ष सुरू झाला आहे तो टाळता आला असता. त्याकरता विधेयक संसदेत आणण्याच्या अगोदर सर्वसहमती घडवली जायला हवी होती. म्हणायला संयुक्त संसदीय समिती स्थापन केली गेली. या समितीने विविध घटकांशी चर्चा केली; पण त्यांनी आमच्या सूचना फेटाळल्या अशी संबंधितांची तक्रार आहे व तेच आताच्या संघर्षाचे कारण आहे. जर सहमती घडवून विधेयक मांडले गेले असते, तर मुळात रात्री दोन अडीच वाजेपर्यंत सरकारला त्यावर सभागृहात चर्चा करावी लागली नसती आणि आपल्या रास्त सूचनांची दखल घेतली गेल्याचे समाधान विरोधकांना मिळाले असते, तर त्यांनीही विषय रस्त्यावर नेण्याचा निर्धार केला नसता. सर्वोच्च न्यायालयात आता ढिगाने याचिका दाखल झाल्या आहेत व केंद्र सरकारलाही कॅव्हेट दाखल करावे लागले आहे. बंगालच्या मुर्शिदाबाद येथे ज्या प्रकारे हिंसाचार झाला आणि नंतर तो थोपवण्यासाठी तेवढाच हिंसक मार्ग स्वीकारावा लागला ते पाहणे कष्टदायकच म्हणावे लागेल. कायद्याला विरोध करताना मुस्लीम समुदायातील जाणकारांच्या म्हणण्याकडेही दुर्लक्ष होते आहे.

जाणकारांच्या म्हणण्यानुसार, मुस्लीम समुदायात मागास, विकासापासून वंचित राहिलेला वर्ग मोठा आहे. मुस्लिमांच्या एकूण संख्येत या वर्गाची संख्या ८५ टक्के आहे. या वर्गाला ना राजकीय हिस्सेदारी मिळाली ना अन्य लाभ पदरात पडले. आमिषांना भुलल्यामुळे सुरुवातीपासूनच समुदायाने त्यांच्या प्रमुख चेहर्यांनी ज्यांना सांगितले त्या चेहर्यांना आणि त्या पक्षांना मतदान केले. तथापि, समुदायातील मूठभर वर्गाचीच भराभराट होत गेली. या समाजातील एका बुद्धजीवी व्यक्तीचे विधान महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, की वक्फकडे एवढी संपत्ती आहे की त्याचा योग्य वापर केला गेला तर देशातील एकही मुस्लीम गरीब राहणार नाही. एवढेच काय त्यातून एकही हिंदूसुद्धा गरीब राहणार नाही. बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी १९८० च्या दशकातील उदाहरण देत हाच मुद्दा मांडला आहे. प्रख्यात अजमेर दर्ग्याचे चिश्ती, ऑल इंडिया सुफी सज्जादनशी काउंसिल, मुस्लीम राष्ट्रीय मंच, भारत फर्स्ट आदी संस्था आणि व्यक्तींनीही हीच भूमिका अधोरेखित केली आहे. ऑल इंडिया इमाम ऑर्गनायझेशनच्या प्रमुखांनीही वक्फ कायद्याचे समर्थन केले आहे. कायद्याचे समर्थन करणार्यांच्या यादीत जमियत हिमायत उल इस्लाम, पसमांदा मुस्लीम समाज आदींचाही समावेश आहे. समुदायातीलच एका राष्ट्रीय संयोजकांच्या म्हणण्यानुसार, वक्फ बोर्डाची देशभरात साडेआठ लाख एकर जमीन आहे. त्यावर समुदायातील बड्या, प्रभावशाली केवळ २०० लोकांचा ताबा आहे. काही धार्मिक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी तर ज्यांनी मालमत्तांवर कब्जा केला आहे त्यांची नावेच जाहीर केली आहेत व त्यानंतर समुदायाच्या भल्याच्या बाजूने बोलणार्या मुस्लीम नेत्यांना आणि विचारवंतांनाच लक्ष्य केले जाते आहे. हा पूर्णत: राजकीय प्रकार आहे. मुळात समुदायाला गोंधळात ठेवायचे असा प्रयत्न होताना दिसतो आहे.

---

## हनुमान जयंतीनिमित्त महासांगवी येथे रक्तदान शिबिर



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील महासांगवी या गावामध्ये हनुमान जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून अनेक तरुणांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली सामाजिक बांधिलकी जपली.

हे शिबिर हनुमान जयंती उत्सव समितीच्या वतीने जिल्हा रुग्णालयात बीड येथील रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते आणि युवक मंडळांचे सहकार्य लाभले. या शिबिरात एकूण १०१ युवकांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन श्री अन्नपूर्णा देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित यांची मोलाची भूमिका राहिली. गावातील सर्व स्तरातील नागरिकांनी शिस्तबद्धरीत्या सहभाग नोंदवत हनुमान जयंतीचे औचित्य सामाजिक कार्यात रूपांतरित केल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## इंदोरच्या पत्रकार सन्मानाने महाराष्ट्राला प्रेरणा; बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाची मागणी वायरल

मुंबई । प्रतिनिधी

दि. १२ एप्रिल २०२५: महाराष्ट्रात रस्ते, पूल आणि चौकांना राजकीय नेत्यांची किंवा त्यांच्या पूर्वजांची नावे देण्याची प्रथा आहे, तर साहित्यिक, विचारवंत, पत्रकार आणि कलावंतांची नावे दुर्लक्षित राहतात. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला ज्येष्ठ साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचे नाव देण्याची मागणी फेटाळली गेली. तसेच, मुंबई-गोवा महामार्गाला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव देण्याची पत्रकारांची मागणी सरकारकडून प्रतिसाद न मिळाल्याने उपेक्षित आहे. या



पार्श्वभूमीवर, इंदोर महापालिकेने एका मुख्य चौकाला पत्रकाराचे नाव देऊन सन्मान केल्याने कौतुकाचा सूर उमटला आहे. यासंदर्भातील अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांची सोशल मीडिया पोस्ट वायरल झाली आहे.

"इंदोरच्या या निर्णयाने पत्रकारांचा सन्मान तर केलाच, पण महाराष्ट्राला दिशा दाखवली. बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ मध्ये 'दर्पण' वृत्तपत्र सुरू करून पत्रकारितेचा पाया घातला. त्यांचे नाव मुंबई-गोवा महामार्गाला द्यावे," असे देशमुख यांनी म्हटले आहे. त्यांनी "शिकारे बाबा, जरा शेजाऱ्याकडून शिका," असा टोला लगावत सरकारला साहित्यिक आणि पत्रकारांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. या पोस्टला सामाजिक माध्यमांवर मोठा पाठिंबा मिळाला असून, पत्रकार आणि साहित्यप्रेमींनी इंदोरच्या पावलावरून महाराष्ट्राने प्रेरणा घ्यावी, अशी मागणी केली आहे. "राजकीय नेत्यांच्या नावांऐवजी सांस्कृतिक योगदान देणाऱ्यांचा सन्मान व्हायला हवा," अशी भावना व्यक्त होत आहे. या चर्चेमुळे जांभेकर यांच्या नावाची मागणी पुन्हा तीव्र झाली आहे. सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## माजी नगरसेविका शांताबाई श्रीश्रीमाळ यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



**शहरातील प्रतिष्टीत व्यापारी परिवारतील जेष्ठ सदस्य असलेल्या श्रीमती शांताबाई श्रीश्री माळ यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी शनिवारी १२ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता दुःखद निधन झाले. १९६७ ते ७२ या काळात त्या माजलगाव नप च्या नगरसेविका होत्या. रविवारी सकाळी ९ वाजता राजस्थानी वैकुंठधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.**

राजस्थानी समाजातील पहिल्या नगरसेविका असलेल्या माजी नगरसेविका श्रीमती शांता बाई हुकूमचंद श्रीश्रीमाळ या अतिशय दानशूर व धार्मिक वृतीच्या म्हणून परिचित होत्या. शहरातील अनेक सामाजिक संस्थांना उभे करण्यात त्यांचे योगदान असल्याचे बोलले जाते. त्यांच्या पश्चात शहरातील व्यापारी अशोकचंद, प्रदिपचंद, दिलीपचंद किशोरचंद पुतणे विजयचंद आणि माणिकचंद नातू अमित ऍंड अभिलाष,७नातवंड ११नाती ८पोतवंड, १मुलीगी४पुतण्या व मोठा परिवार आहे. रविवारी १३ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता राजस्थानी वैकुंठ धाम येथे अंत्यविधी करण्यात येणार आहे.

## जागृत दक्षिणमुखी हनुमान मंदिर बारागाड्या कार्यक्रम उत्साहात

जालना। प्रतिनिधी

**नवसाला पावणारा जालना शहरातील रामनगर येथील जागृत दक्षिणमुखी घनतुप्त हनुमान मंदिर बारागाड्या कार्यक्रम हनुमान जयंतीनिमित्त दि. १२ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**



या बारागाड्या उत्सवासाठी अर्जुनराव खोतकर, भास्करराव अंबेकर, सुरेश रत्नपारखे, जगदीश भरतीया, राजेश राऊत, अशोक मेहत्रे, पंढरीनाथ सोळुंके, बाबुराव मामा सतकर, संजय राठोड, म्हसुजी वानखेडे, अॅड. बी.एम. कुलकर्णी, बाबासाहेब वानखेडे, अरूण वानखेडे, संदीप वानखेडे बाबासाहेब सोनवणे, हरिभाऊ वानखेडे, साई अॅटो पार्टस्?, ज्ञानेश्वर वानखेडे, शंकर वानखेडे, यांनी सहकार्य केले. यावेळी घनतृप्त हनुमान बारागाड्या वउत्सव समितीच्या वतीने अहंकार देऊळगांव येथे भगवान येवले, गणेश सोमधाने व इतर गावातील लोक बारागाड्यासाठी सहकार्य करीत आहे. आज रोजी रामनगर येथील दक्षिण मुखी घनतृप हनुमान नवसाला पावणारा याच्या बारा गाड्या आज रोजी काढण्यात आल्या वा हनुमान मंदिरात मोठ्या प्रमाणात भक्तगणांची गर्दी दिसून येत आहे.

## मेघनाताई साकोरे-बोर्डीकर याचा सत्कार कार्यक्रमास उपस्थित रहावे-महायुतीच्या वतीने आवाहन

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री,ना.सौ. मेघनाताई साकोरे- बोर्डीकर राज्यमंत्री, सार्वजनीक आरोग्य व कुटूंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता सार्वजनिक बांधकाम मंत्रालय, मुंबई याचा महायुतीच्या वतीने आज दि. १३ एप्रिल रविवार सकळी ११:०० वाजता शहरातील मॉ. वैष्णवी मंगल कार्यालय, माजलगाव येथे आयोजित केला आहे.या कार्यक्र माचे अध्यक्षस्थानी आ.प्रकाश सोळंके, माजी राज्यमंत्री असून प्रकाश आनंदगावकर, जयसिंग सोळंके,अरूण राऊत तालुकाध्यक्ष, भाजपा,तुकाराम येवले, तालुकाध्यक्ष शिवसेना,सुरेंद्र रेदासणी,व्यापारी अध्यक्ष हे उपस्थित रहाणार आहे. तरी या कार्यक्रमास हजारोच्या संख्याने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीचे संभाजी शेजुळ,अच्युतराव लाटे,जयदत्त नरवडे,खलील पटेल,अशोक तिडके,धनंजय सोळंके,अभिजित कोंबडे यांनी केले आहे.

## जालन्यात यावर्षी गणपती बाप्पाचं विसर्जन होणार घाटात;घाटाचे काम प्रगतीपथावर-आ.अर्जुनराव खोतकर

जालना। प्रतिनिधी

**जालना शहरातील मोतीतलाव लगत विसर्जन घाट तसेच गणपती विसर्जन कुंडाचे काम प्रगतीपथावर आहे. सदरील संपुर्ण काम २०२५ अखेरपर्यंत पुर्ण होईल. यासाठी आपण वैयक्तीक लक्ष घालून असून, येथे संगीत कारंजे, गार्डनची निर्मीती करणार असल्याची माहिती आ. अर्जुनराव खोतकर यांनी दिली.**

येथील मोतीतलाव परिसरात केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजना अंतर्गत सुमारे ११ कोटीच्या विसर्जन घाट व इतर सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. या कामाची १२ एप्रिल रोजी आ. अर्जुनराव खोतकर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.. यावेळी जालना शहर मनपाचे आयुक्त संतोष खांडेकर, अभियंता सऊद, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, फेरोजलाला तांबोळी, मेघराज चौधरी व इतरांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना आ. खोतकर म्हणाले की, विधानसभा निवडणूकीत मतदारांनी मला भरभरून मतदान केले. मी, निवडून आल्यानंतर जालना शहराच्या विकासासाठी कामाला लागलो आहे. त्याचाच एक भाग म्हणून मोती तलाव परिसरात पुर्नरूज्जीवन व पुर्नविकास करण्याचे काम सुरू केले आहे.शहराच्या विकासाबरोबरच मोतीतलावाची ऐतिहासिक वास्तूंचे जतन व्हावे, त्यांची माहिती सर्वदूर पोचावी, यासाठी काळा पाषाण दगडाने या कुंडाची निर्मीती करीत आहे. दगडी बांधकाम असलेल्या या तलावात स्थानिक नागरिक विरूंगळ्यासाठी येईल, व आसपासच्या गावातील नागरिकांसाठीही हे विसर्जन घाट पर्यटनस्थळ ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. येथे श्री गणपती विसर्जन, देवी विसर्जन, छट पुजा असे धार्मीक




कार्यक्रम पार पडणार आहे. या तलावाच्या परिसरात सजावट, संगीत कारंजे करण्यात येणार असून, जालना शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. त्यामुळे या ठिकाणच्या तलावाच्या अवतीभवती सजावट , संगीत कारंजे व सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आदि कामे करण्यात येणार आहे, असेही खोतकर यांनी म्हटले. आर्किटेक्टकडून अंदाजपत्रक तयार केले, नकाशे व डिझाईन केली, त्यानुसार सदरील विसर्जन कुंडाचे काम सुरू असल्याचेही आ. खोतकर म्हणाले. यावेळी आयुक्त संतोष खांडेकर यांनी विसर्जन घाटाच्या पाण्याची साठवण क्षमता ३.५ कोटी लिटर असल्याचे सांगत रिटेनिंग वॉल लांबी २०३ मी. असल्याचे सांगितले. विसर्जन झाल्यानंतर याच ठिकाणी जालनेकरांसाठी आकर्षक विद्युत रोषणाई असलेले कारंजे देखील पाहायला मिळणार आहेत. यासंदर्भात माहिती देताना आमदार खोतकर म्हणाले, "केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेतून हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सुमारे ११ कोटींचा हा प्रकल्प असून मे २०२५ पर्यंतच पूर्ण व्हायला पाहिजे होता परंतु त्याला मुदतवाढ देऊन गणपती विसर्जनापूर्वी हा पूर्ण केल्या जाणार आहे. साडेतीन कोटी लिटर पाण्याची साठवण क्षमता या हौदाची आहे. हौदाच्या बाजूलाच घाटही बांधल्या जात आहे. गणपती विसर्जनासाठी क्रेनची देखील इथे व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासोबतच नागरिकांना विसर्जनाच्या वेळी किंवा अन्य वेळी या ठिकाणी विरंगुळा म्हणून आल्यानंतर भरपूर मोकळी जागा ठेवण्यात आली आहे. प्रत्येकी ३० फूट रुंदीचे तीन घाट इथे बांधल्या जात आहेत. या घाटावर येण्यासाठी सर्व बाजूंनी काँक्रीटचे रस्ते केले जात असून गणपती विसर्जन कुंडाचा आकार हा १०३ मीटर रुंद ७५ मीटर लांब आणि सहा मीटर खोल असा असणार आहे. तसेच या घाटामुळे जालना शहरातील नागरिकांची गणपती विसर्जन च्या वेळी गैरस होणार नाही यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या घाटामुळे अतिक्रमणधारकावर काही प्रसंगी आल्यास त्याचा निवारा करून देण्याचं काम जिल्हा प्रशासन दखल घेईल असे शेवट आमदार अर्जुन खोतकर यांनी सांगितले

---

## पान १ वरून...

### कृषी विभागाच्या योजनांसाठी

विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पीकविमा, कर्जमाफी, अनुदान, पीक कर्ज, पीएम किसान, हमीभाव आदि योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करावी, असंही आवाहन कृषी विभागाने केलं आहे.

------------

### सोनिया-राहुल

झाले आहे. नॅशनल हेराल्ड हे वृत्तपत्र असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड या कंपनीमार्फत प्रकाशित केले जाते. ही कंपनी १९३७ मध्ये स्वातंत्र्य चळवळीच्या काळात सुरू झाली होती आणि नंतर काँग्रेसशी निगडित राहिली. काही काळासाठी नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र बंद पडले, पण एजेएलकडे अजूनही देशभरात अनेक मौल्यवान मालमत्ता शिल्लक आहेत. २०१० मध्ये यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड ही नवी कंपनी स्थापन झाली, ज्यामध्ये सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचे प्रत्येकी ३८ टक्के शेअर्स आहेत. उर्वरित शेअर्स काँग्रेस नेते मोतीलाल व्होरा व ऑस्कर फर्नांडिस यांच्या नावे होते. काँग्रेस पक्षाने एजेएलला दिलेल्या सुमारे ९० कोटी रुपयांच्या कर्जाची वसुली न करता, यंग इंडियन कंपनीला एजेएलचे संपूर्ण नियंत्रण व मालकी दिली गेली. ही गोष्ट मुळातच वादग्रस्त ठरली. या व्यवहारावरून भाजप खासदार सुब्रमण्यम स्वामी यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आणि पुढे चौकशी सुरू झाली.

---------

### आ.संदीप क्षीरसागरां विरोधात

नवनीत कॉवत यांच्याकडे त्यांनी लेखी तक्रार दिली असून, पगारे कुटुंब भयभीत झाल्याने पोलीस संरक्षण देण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. संदीप क्षीरसागर यांच्या स्वीय सहायकाच्या मोबाईलहून पगारे यांना धमकी देणारा फोन कॉल आला होता, असे म्हणत संदीप क्षीरसागर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी पगारे यांच्याकडून करण्यात येत आहे. पगारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.१४ वाजता आ.क्षीरसागर यांचे तीन मिसकॉल आले मात्र फोन सायलेंट मोडवर होता. आमदार क्षीरसागर यांचे स्वीय सहायक चौरे घराजवळ आले. त्यांच्यासोबत आणखी एकजण होते. यावेळी चौरे यांच्या फोन वरून आ.क्षीरसागर यांनी शिवीगाळ केली. तसेच, आता मी बीडला आल्यावर लवकर माझ्याकडे यायचे असे म्हणत धमकी दिली. यावरून कुंटुब भयभीत झाले असल्याचे पगारे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, याप्रकरणी आता संदीप क्षीरसागर काय बाजू मांडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागेल असून या तक्रारीने बीडच्या जिल्हा प्रशासनात खळबळ उडाली आहे.

------------

### छत्तीसगड-महाराष्ट्र सीमावर्ती

ही चकमक झाली. इंद्रावती नॅशनल पार्क भागात अगोदरही मोठ्या संख्येत पोलिसांनी नक्षलवाद्यांना ठार केले होते. अजूनही त्या जंगल भागात कॉम्बिंग ऑपरेशन सुरूच आहे. त्यामुळे आगामी काळातही येथे आणखी काही नक्षलवाद्यांवर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

----------

### शेतकरी इतका हतबल

हतबल बनवले आहे. हे चित्र अत्यंत करुण आहे. आपल्या अन्नदात्याच्या घामाचे मोल काय? असाही सवालही उपस्थित केला. शेवटी जयंत पाटील आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, एकाबाजूला श्रीमंत धनदांडग्या लोकांसाठी सरकार खैरात वाटत सुटले आहे. तर दुसरीकडे अनेक शेतकरी कुटुंब एक, दोन लाखांच्या कर्जपायी घरचा आधार गमावत आहेत. शेतकरी स्व. हरिदास बोंबले यांच्या कुटुंबाला न्याय मिळायलाच पाहिजे तसेच सरकारने बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कंपनीवर तत्काळ फौजदारी खटला दाखल केला पाहिजे. शेतकऱ्याला नुकसानीचा परतावा कंपनीकडून मिळाला पाहिजे अशी मागणीही केली.

--------------

### वक्फ कायदा लागू करणार नाही

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शनिवारी मुर्शिदाबाद जिल्ह्यातील हिंसाचारग्रस्त भागात जाऊन शांततेचे आवाहन केले. यानंतर वर केलेल्या पोस्टमध्ये ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे की, " पश्चिम बंगाल राज्यातील सर्व धर्माच्या लोकांना माझे प्रामाणिक आवाहन आहे की, कृपया शांत राहा, संयम ठेवा. धर्माच्या नावाखाली कोणत्याही बेकायदेशीर वर्तनात सहभागी होऊ नका. प्रत्येक मानवी जीवन मौल्यवान आहे. राजकारणासाठी दंगली भडकावू नका. दंगली भडकवणारे समाजाचे नुकसान करत आहेत.

---------

### सुप्रीम कोर्टाची राष्ट्रपतींसाठी

या निर्णयादरम्यान, न्यायालयाने राज्यपालांकडून राष्ट्रपतींकडे पाठवलेल्या विधेयकांबाबतही भूमिका स्पष्ट केली. हा आदेश ११ एप्रिल रोजी सार्वजनिक करण्यात आला. शुक्रवारी रात्री वेबसाइटवर अपलोड केलेल्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने संविधानातील अनुच्छेद २०१ चा संदर्भ दिला. राज्यपालांकडून पाठवलेल्या विधेयकांप्रकरणी राष्ट्रपतींना पूर्ण व्हेटो अथवा पॉकेट व्हेटोचा अधिकार नाही. त्यांच्या निर्णयावर न्यायालयीन परीक्षण होऊ शकते आणि विधेयकाची घटनात्मक वैधता ठरवण्याचा अधिकार न्यायालयाकडेच आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, अनुच्छेद २०१ नुसार विधानसभेने मंजूर केलेले विधेयक जेव्हा राज्यपाल राष्ट्रपतींकडे विचारासाठी पाठवतात, तेव्हा राष्ट्रपतींनी मंजुरी द्यावी किंवा नकार द्यावा, परंतु निर्णय घ्यावा लागतो.

---------

### महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून

यावेळी या अधिकाऱ्यांना नदीपात्रात जागोजागी झालेले अतिक्रमण, कचऱ्याचे ढीग दिसले. जवळपास तीन तास पहाणी केल्यानंतर हे अधिकारी परभणीकडे रवाना झाले.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. १३ एप्रिल २०२५

३

## शिक्षणतीर्थ संस्कृती विद्यालयाचा महाराष्ट्रात डंका

**पाटोदा । प्रतिनिधी**

शिक्षण तीर्थ संस्कृती विद्यालयमध्ये विद्यार्थ्यांना नेहमीच विविध स्पर्धा परीक्षांना बसवली जाते व त्यांना प्रोत्साहन दिले जाते. पुण्याच्या केअर फॉर यू इंडिया या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील ७२ शाळांमध्ये जनरल नॉलेज , क्राफ्ट ,चित्रकला , सिंगिंगच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

संस्कृती विद्यालयातील १३ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला आहे .आतापर्यंत दोन राऊंड झाले आहेत . दुसऱ्या राउंड मध्ये २७ शाळा होत्या . त्यामध्ये पहिल्या तीनमध्ये संस्कृती विद्यालयाचे विशाल बोरसे, योगेश पवार, बालाजी राहाटे, प्रशांत साबळे यांचा गट दुसऱ्या फेरीमध्ये पहिल्या तीनमध्ये आला आहे.पुढची ऑडिशन पुणे येथे होईल .तिसऱ्या ऑडिशन मध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे मोफत शिक्षण केअर फॉर यू इंडिया या संस्थेमार्फत होणार आहे .या स्पर्धेसाठी श्री .भैय्या सर ,श्री गजानन जानोळे सर , रामसर किरण सर तसेच ऋतुजा धर्माधिकारी साक्षी गवळी मॅडम यांनी मुलांना मार्गदर्शन केले .मुलांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापिका सौ . अर्चनाताई जानोळे ,संस्थापक अध्यक्ष डॉ .दत्ता नलावडे सर यांनी त्यांचे कौतुक केले आहे व पुढील ऑडिशन साठी शुभेच्छा दिल्या .

# क्रिएटिव्ह एंटरटेनमेंट इकॉनॉमीचे नेतृत्व भारत करेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दृढ विश्वास



मुंबई । प्रतिनिधी

मुंबईत १ ते ४ मे २०२५ दरम्यान होणाऱ्या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट वेव्हज २०२५ च्या निमित्ताने क्रिएटिव्ह एंटरटेनमेंट क्षेत्रातील जगातील सर्वात मोठा इव्हेंट होणार आहे. जागतिक दर्जाच्या या परिषद आयोजनाचा मान महाराष्ट्राला मिळाला असून यामुळे जगातील 'क्रिएटिव्ह एंटरटेनमेंट' क्षेत्र मुंबईकडे आकर्षित होणार आहे. यामुळे भविष्यात क्रिएटिव्ह एंटरटेनमेंट इकॉनॉमीचे नेतृत्व भारत करेल, असा दृढ विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वेव्हज २०२५च्या निमित्ताने बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ कन्व्हेंशन सेंटर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्य सचिव सुजाता सौनिक तसेच केंद्रीय सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्यावतीने मुंबईमध्ये ऑडीओ व्हिज्युअल एंटरटेंटमेंट समिट (वेव्हज) २०२५ या मनोरंजन क्षेत्रातील जागतिक परिषदेचे आयोजन १ ते ४ मे २०२५ दरम्यान 'जिओ कन्व्हेक्शन सेंटर' येथे होणार आहे. जगाला भारताच्या मनोरंजन विश्वातील कला गुण, सृजनशीलता दाखविण्याची संधी आहे. या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी राज्य शासन संपूर्ण सहकार्य करेल. जगाला भारताची नवी ओळख करून देण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महत्वाकांक्षी संकल्पना आहे. ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी या परिषदेच्या आयोजनाचा मान महाराष्ट्राला मिळाला आहे. करमणूक क्षेत्राची अर्थव्यवस्था अतिशय जलदगतीने विकसित होत आहे. यात भारताने देखील अग्रेसर असले पाहिजे ही भूमिका आहे. वेव्हज २०२५च्या निमित्ताने शंभर पेक्षा अधिक देश भारतात सहभागी होणार आहेत. पाच हजार पेक्षा अधिक सहभागींची नोंद होणार असून ही परिषद दरवर्षी मुंबईत होणार आहे. त्यामुळे मुंबईचे महत्व जागतिक पातळीवर वाढणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण विभागाची मालाडला २४० एकर जागा आहे. या जागेवर जागतिक दर्जाच्या एंटरटेनमेंट हबची व्यवस्था उभी करण्यात येणार आहे. त्यामुळे जगातील करमणूक क्षेत्रातील नामवंत मुंबईकडे आकर्षित होतील. त्याचबरोबर आयआयसीटी म्हणजे इंडियन इंस्टिट्यूट ऑफ क्रिएटीव्ह टेक्नॉलॉजी नावाची संस्था मुंबईला दिली आहे. ही महत्त्वाची संस्था मुंबईत असल्याने या क्षेत्रात मुंबई जगाच्या एक पाऊल पुढे असणार आहे. करमणूक क्षेत्राची मुंबई ही जगाची राजधानी असेल असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यावेळी आयआयसीटीबरोबर सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, गोंदिया बल्लारशाह या रेल्वे मार्गिकाचे दुहेरीकरण करण्यासाठी ४,८१९ कोटी रूपये केंद्र शासनाने दिले आहे. या दुहेरीकरण प्रकल्पामुळे विदर्भाचा खूप मोठा फायदा होणार आहे. त्याचबरोबर छत्तीसगड, तेलंगणा आणि मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश राज्यांबरोबर व्यापार-व्यवहार वाढणार आहे. तसेच राज्यात सर्व प्रकारच्या प्रवासासाठी एक कार्ड प्रणाली लागू करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार, नराधम आरोपीला चार दिवसाची पोलीस कोठडी

अंबड/प्रतिनिधी

लग्नाचे आमिष दाखवून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी नकुल सत्यनारायण निर्मळ रा. सेलु जि. परभणी याच्याविरूध्द अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. ही घटना ४ व ५ एप्रिल २०२५ रोजी ठाकुरवाडी ता. अंबड येथे घडली. सदरील याप्रकरणी आज आरोपीला न्यायालयामध्ये हजर केले असता न्यायालयाने आरोपीला १५ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

वरिल विषयी वृत्त असे की, सदरील पिडीत अल्पवयीन मुलगी रामपुरी ता. पाथरी जि. परभणी येथील रहिवाशी असून, तिला नकुल निर्मळ याने प्रेमाच्या जाळ्यात ओढले. लग्नाचे आमिष दाखवून तिला ठाकुरवाडी ता. अंबड येथून पळवून नेले . त्यानंतर तिच्याशी तिच्या इच्छेविरूध्द संबंध करून, तिच्यावर अत्याचार केला. तसेच सेलु येथे नेवून तिच्यावर अत्याचार केला.

याबाबत अंबड पोलिस्? ठाण्यात सदर पिडीत मुलीच्या फिर्यादीवरून अंबड पोलिस ठाण्यात नकुल निर्मळ याच्याविरूध्द भादंवि कलम ३७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष्य नोपाणी, प्रशिक्षणार्थी भापोसे सिध्दार्थ बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि आदिनाथ ढाकणे पुढील तपास करीत आहे.

## महात्मा फुले दांपत्यास भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा-डॉ.तांदळे

बीड । प्रतिनिधी

समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व या मूल्यांचे पुरस्कर्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या दांपत्याने मुलीचे शिक्षण विधवांचे



पुनर्विवाह अस्पर्शता व जातीव्यवस्थेची निर्मलांत यासाठी महत्त्वाचे काम केलेले असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने नुकताच केंद्र शासनाकडे महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले दांपत्यांना मनोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे नुकताच पाठवलेला आहे स्त्री शिक्षणाचे जनक ,क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले दांपत्यास भारतरत्न पुरस्कार देण्याबाबत मागणीचे २१ वे निवेदन बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती दिनी दि.११ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार शिंगटे साहेब यांच्या मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी व राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे . यावेळी डॉ.संजय तांदळे, नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, डी. जी. तांदळे उपस्थित होते.

# जयभवानीच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे कार्य कौतुकास्पद - पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव

## स्पर्धा परीक्षेतील गुणवंतांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयाच्या ''स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे कार्य कौतुकास्पद आहे ! असे प्रतिपादन पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.श्री.सोमनाथ जाधव यांनी केले ते जय भवानी महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आयोजित स्पर्धा परीक्षेत विविध पदांसाठी घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना म्हणाले की पाटोदा सारख्या ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांसाठी या महाविद्यालयात मोफत स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करून अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय अधिकारी म्हणुन त्यांची निवड झाली आहे.त्या सर्व गुणवंताचे अभिनंदन!करून त्यांना भविष्यातील प्रशासकीय कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.व उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.या सत्कार समारंभाचे मार्गदर्शक म्हणुन प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते तर या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे हे होते.व्यासपीठावर उच्च न्यायालयाचे विधीज्ञ ॲड.श्री.तात्यासाहेब घुमरे, दै.झुंझार नेताचे जेष्ठ पत्रकार श्री.विजय जाधव,दै.सकाळचे श्री.विजय जोशी,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.सतिश जरांगे,पालक श्री.कैलास आवारे ,श्री.सखाराम जायभाये, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा.डॉ.संदीपान टिकवणे व सत्कार मूर्ती श्री.प्रमोद कर्डुले,रोहीत जायभाये,कु.अंजली



जायभाये व राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत स्वर्ण पदक मिळविणारी कु.अमृता आवारे यांची उपस्थिती होती.प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.व त्यांना सामुहिक अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक या विभागाचे समन्वयक प्रा. डॉ संदीप किवणे यांनी केले.सत्कार मूर्ती श्री.प्रमोद कर्डुले,रोहित जायभाये ,कु.अंजली जायभाये,व कु.अमृता आवारे यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला सत्काराला उत्तर देताना श्री.प्रमोद कर्डुले,रोहित जायभाये ,कु.अंजली जायभाये व कु.अमृता आवारे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले कि या महाविद्यालयात शिक्षण घेताना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामुळेच आम्हाला अभ्यासाची प्रेरणा मिळाली व त्यामुळेच आम्हाला परीक्षेत यश मिळाले तसेच विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले.पालक श्री.सखाराम जायभाये, जेष्ठ पत्रकार श्री.विजय जाधव ,श्री.विजय जोशी,ॲड.श्री. तात्यासाहेब घुमरे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी सांगितले की पाटोदा सारख्या ग्रामीण भागातील मुलांमध्ये बौद्धिक शक्ती आहे.परंतु त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही म्हणूनच महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु केले होते.व त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी यश मिळवत आहेत.हे पाहून समाधान वाटते.या पुढे ही ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील अशी ग्वाही दिली.व सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे यांनी सांगितले की आमच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी व आमचे विद्यार्थी यशस्वी झाल्यानंतर त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठीच अशा सत्कार समारंभाचे आयोजन केले जाते.या पुढे राज्य लोकसेवा आयोगा बरोबरच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत संदर्भात या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रा च्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येईल असा शेवटी आशावाद व्यक्त केला.या कार्यक्रमाचे बहारदार संचलन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी केले.तर आभार अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक यांनी मानले.या सत्कार समारंभास सर्व प्राध्यापक वृंद,पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.हा सत्कासमारंभ यशस्वी करण्यासाठी नाटकार प्रा.बापू घोक्षे,प्रा. डॉ. बंडू लोखंडे, प्रा.डॉ. प्रवीण शिलेदार,ग्रंथपाल श्रीमती प्रा.ज्योती रकटे ( कटारे ) ,प्रा.केशव सुर्वे,प्रा.बाळासाहेबजोशी,प्रा.शिवाजी मोरे,श्री.शहाजी लवुळ,श्री.नामदेव पोटफाडे,श्री.कुणाल काळे,श्री.दत्ता चादर व श्रीमती साळुबाई नाईकनवरे यांनी अथक परिश्रम घेतले.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दिक्षांत सोहळा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत सुंदरराव सोळंके महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्र वितरणाचा सोहळा महाविद्यालयीन स्तरावर संपन्न झाला.यावेळी मार्च / एप्रिल २०२४ व ऑक्टोबर २०२४ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.



सुंदरराव सोळंके महाविद्यालयात घेण्यात आलेल्या दिक्षांत सोहळ्यात प्रमाणपत्राचे वाटप प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.के. सानप होते.यावेळी उपप्राचार्य डॉ.एन. के.मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, भाषा विषयाचे प्रमुख डॉ.के.बी. गंगणे, विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ.प्रविण देशपांडे,सामाजिकशास्त्र प्रमुख डॉ. अरुण पेंटावार, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सचिन रुद्रवार अधिक्षक सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सूचनेनुसार २०२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ महाविद्यालय स्तरावर घेण्यात आला.यावेळी बी. ए. ,बी.एस्सी,बी. कॉम,बी.सी.ए., बी.सी.एस.व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गरिबांची कामे तात्काळ करावीत -खा.काळे

**अंबड । प्रतिनिधी**

सर्वसामान्य गरीबाचे कामे वेळेत होण्यासाठी खा.डॉ.कल्याण काळे येणे दि ११ एप्रिल रोजी अंबड पंचायत समिती सभागृहात सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना सर्वसामान्याचे काम वेळेत पूर्ण करावी अशा सूचना या बैठकीमध्ये देण्यात आल्या.

सदर बैठकीमध्ये सर्व अधिकारी कर्मचारी व तालुकास्तरीय कार्यालय प्रमुख उपस्थित होते.विविध विषयावरती चर्चा करून त्यावर काय उपाययोजना करता येतील यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली



सदर वेळी लोकसभा सदस्य यांनी सर्व अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी यांना सविस्तर मार्गदर्शन करून जनतेच्या कामाप्रती संवेदनशील राहण्याच्या सूचना दिल्या. त्याचबरोबर कोणत्याही कामांमध्ये दिरंगाई करण्यात येऊ नये याबाबत सुद्धा सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सदरील यावेळी बैठकीमध्ये खा. डॉक्टर कल्याण काळे, माजी आमदार संतोष सांबरे तहसीलदार विजय चव्हाण, मुख्याधिकारी उकिरडे, गटविकास अधिकारी तथा जिल्हा परिषद चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी उदयसिंह राजपूत , बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री दगुला, शिक्षण अधिकारी श्री चव्हाण ,तालुका कृषी अधिकारी बी आर गंडे , जलसंधारण विभागाचे अधिकारी व इतर सर्व यंत्रणेचे तालुका कार्यालय प्रमुख उपस्थित होते. तसेच विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### तहसील कार्यालयातून

संगणक चोरीला गेले ची तक्रार पाटोदा पोलीस ठाण्यात केली आहे त्यावरून अज्ञाता विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे दरम्यान शहर आणि परिसरात चोरट्याची सत्र सुरूच आहे पोलीस स्टेशन पर्यंत पोहोचत नसल्याने तक्रार देऊन उपयोग नाही अशी सर्वसामान्यांची भावना झाली आहे आता तहसील सारखे शासकीय कार्यालय ही असुरक्षित असल्याचा प्रकार समोर येत आहे.

### देवाजी कांबळे यांचे

सुप्रसिध्द विधीज्ञ तथा समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.शिवाजी कांबळे यांचे ते वडील होत. शोकाकुल वातावरणात आदर्श शिक्षक देवाजी मारूती कांबळे यांच्या पार्थिवावर बोरूळा तलाव स्मशानभूमीत शुक्रवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक उपस्थित होते.

### खरबुजाचे भाव घसरले!

ओळखल्या जाणाऱ्या खरबुजाची लागवड जानेवारीत झाली होती आणि मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून काढणी सुरू झाली आहे. रमजान महिना डोळ्यासमोर ठेवून अनेक शेतकऱ्यांनी खरबुजाची लागवड केली होती.परंतु मागणीच्या तुलनेत आवक वाढल्याने भावावर नकारात्मक परीणाम झाल्याचे पहावयास मिळाले.कुंदन जातीच्या खरबुजाला विशेष मागणी असली तरी रॉयल आणि विजय या जातीचे खरबुजही विक्रीसाठी बाजारात आलेले पहावयास मिळतात.

### भारतरत्न डॉ.बाबासाहेब

जय भीम पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे या व्यतिरिक्त शाळांनी विविध उपक्रम आयोजित केलेले आहे याची माहिती या बैठकीत देण्यात आली.या उपक्रमाचा एक भाग म्हणून राज्यघटनेची उद्देशिका वाचून दाखवली जाणार आहे तसेच विविध प्रकारचे पथनाट्य आणि परिसंवाद राज्यात अनेक ठिकाणी होणार आहेत.नागरिकांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# फार्मसी महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळा अंतर्गत असलेल्या (औषध निर्माण) बी. फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि ११ रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि आदराने साजरी करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित या जयंती उत्सवाच्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महात्मा फुले यांच्या समाज सुधारणेच्या कार्याला उजाळा देत, त्यांच्या विचारांचा आजच्या पिढीला प्रेरणा म्हणून स्वीकार करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.**




कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.मामून खुरेशी यांनी उपस्थितांना संबोधित करताना महात्मा फुले यांच्या स्त्री शिक्षण, समता आणि सामाजिक न्यायाच्या कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले महात्मा फुले यांनी समाजातील दडपशाही आणि अंधश्रद्धेविरुद्ध लढा देत शिक्षणाचा पाया रचला. त्यांचे विचार आजही आपल्याला प्रेरणा देत असल्याचे प्रा मामुन कुरेशी यांनी सांगितले. यावेळी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या भावना व्यक्त करतांना त्यांनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या प्रचार प्रसार व योगदानाबद्द माहिती सांगितली. पुढे ते म्हणाले की महात्मा फुले यांनी समाजातील प्रत्येक वर्गाला शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी आपले आयुष्य वेचले. आजच्या तरुणांनी त्यांचा हा वारसा पुढे न्यावा असे आवाहन प्राचार्य तरके यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. त्याचबरोबर त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक भान जपण्याचे आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजसेवा करण्याचा सल्ला देखील दिला. कार्यक्रमात प्राध्यापक वर्गातील डॉ. रिझवान पठाण, डॉ. गीतांजली चव्हाण, प्रा. काव्या रेड्डी, प्रा. मंजुषा करेप्पा, प्रा. इम्रान सय्यद, प्रा. अश्विनी घोलकर, प्रा. अमर कावरे, डॉ. गणेश गिरी आणि प्रा. साखरे विशाल यांनी विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनीही महात्मा फुले यांच्या कार्यावर आधारित भाषणे, कविता आणि सांस्कृतिक सादरीकरण केले. विशेषतः एन एस एस या विभागाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेने सर्वांचे लक्ष वेधले. या कार्यक्रमाच्या आयोजन व यशस्वीतेसाठी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे विद्यार्थी ,प्राध्यापक, त्याचबरोबर शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी देखील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी महात्मा फुले यांच्या विचारांना आत्मसात करून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संकल्प केला. हा जयंती समारोह विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागवणारा आणि क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करणारा असाच ठरला.

cmyk

# लासलगाव उपबाजाराच्या जमीन उपलब्धतेसाठी शासन सकारात्मक

**नाशिक । प्रतिनिधी**

**लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विंचूर उपबाजारासाठी सुभाषनगर येथे ८ हेक्टर ६१.५६ आर, तर खानगाव नजीक येथील उपबाजारासाठी ३.५० हेक्टर जमीन बाजार समितीस उपलब्ध करून देण्याबाबत शासन सकारात्मक असून हा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. लवकरच बाजार समितीला जमीन उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच लासलगाव येथील 'ब' सत्ताप्रकार मिळकती 'क' सत्ता प्रकारात नियमित करण्यास राज्य शासन सकारात्मक आहे.**



माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या पाठपुराव्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात बैठक झाली.या बैठकीत माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या वतीने समीर भुजबळ,महसूल विभागाचे सहसचिव, 'ब' सत्ता धारकांच्या वतीने शैलेश ठाकरे उपस्थित होते. तर जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिकचे अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब पारधे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, निफाड तहसीलदार, लासलगाव बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे दूरदृष्य पद्धतीने बैठकीस उपस्थित होते. चालू रेडीरेकनराचा दर भरून नियमित करण्याबाबत जिल्हाधिकारी व 'ब' सत्ताधारक समितीमध्ये बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल. यासाठी माजी खासदार समीर भुजबळ हे समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडतील, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीत दिली. लासलगांव बाजार समितीच्या विंचूर उपबाजार विस्तारासाठी सुभाषनगर व खानगाव नजीक शिवारातील उपबाजार आवारासाठी जागा शासकीय दराने खरेदी तसेच लासलगाव येथील 'ब' सत्ताप्रकार मिळकती नियमित करण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. या प्रस्तावाबाबत छगन भुजबळ यांचा शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता. महसूल विभागाच्या ३ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार नाममात्र १ रुपया कब्जेहक्काने रक्कम आकारून दिली जावी. बाजार समितीमध्ये होणारी उलाढाल बघता बाजार समितीचा विस्तार होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासनाने या प्रस्तावाला लवकर मंजुरी द्यावी शासनाला आवश्यक ते सहकार्य केले जाईल, असे यावेळी समीर भुजबळ यांनी सांगितले. शासनाच्या सकारात्मक धोरणामुळे सुभाषनगर येथे कांदा निर्यात सुविधा केंद्र, तर खानगावनजीक येथे मिरची हब निर्माण होण्यास मदत होणार आहे. यामुळे आता लासलगाव बाजार समितीचा विस्तार अधिक वाढून शेतकऱ्यांना शेतमाल खरेदी विक्रीच्या सुविधा उपलब्ध होण्यासोबतच कांदा निर्यातीसाठी अधिक फायदा होणार आहे.

# शेतीमाल स्वच्छतेसाठी ड्रम वॉशर, स्प्रे वॉशर



**ड्रम वॉशर यंत्रामध्ये स्वयंचलित किंवा अर्ध स्वयंचलित प्रणाली उपलब्ध आहे. ही प्रणाली प्रामुख्याने गाजर, बटाटा, बीट, रताळे अशा कंदमुळे, मोठ्या फळांसाठी वापरली जाते. एका कललेल्या ड्रममध्ये शेतीमाल भरला जातो. हा ड्रम पाण्यामध्ये यंत्राच्या साह्याने फिरवला जातो. त्यामुळे एकाच वेळी मोठ्या प्रमाणात फळे किंवा कंदमुळे वेगाने स्वच्छ होतात. कलत्या ड्रममुळे त्या पुढे पुढे सरकत बाहेर पडतात. विशेषतः औद्योगिक प्रक्रियासाठी आवश्यक या सारख्या मोठ्या आकाराच्या शेतीमालाच्या स्वच्छतेसाठी ही यंत्रणा उपयोगी पडते. यात वापरल्या जाणाऱ्या ड्रमचे मेटल ड्रॅम, प्लॅस्टिक कोटेड असे प्रकार उपलब्ध आहेत. मुख्यत्त्वः एका फिरणाऱ्या ड्रममध्ये जलप्रवाह आणि घर्षणाने फळे आणि भाज्या स्वच्छ केल्या जातात.**

**धुण्याची प्रक्रिया** : ड्रम वॉशर मशिनच्या फिडिंग चेंबरद्वारे ड्रममध्ये शेतीमाल टाकला जातो.

या ड्रमच्या आतमध्ये कमी वेगाने फिरणारी प्रणाली असते. त्यात पाणी भरले जात असते. या फिरण्यासोबतच पाण्याच्या वेगामुळे उत्पादनांवर घर्षण निर्माण होते. त्यावरील अशुद्धी दूर होते. पाण्याचा प्रवाह उच्च दाबाने सोडला जात असल्याने उत्पादनांवरील माती, धूळ आणि रसायने काढली जातात. ब्रशिंग आणि स्क्रबिंग सिस्टिम – काही यंत्रामध्ये ब्रशिंग सिस्टिम असते. त्याद्वारे शेतीमालावरून ब्रश सतत घासला जातो. त्यामुळे साध्या पाण्याने किंवा एकमेकातील घर्षणानेही न निघणाऱ्या अधिक कठीण अशुद्धी काढली जाते. शेतीमाल अधिक स्वच्छ होतो.

शुद्ध पाण्याने अंतिम धुणे – अशुद्धीमुळे प्रक्रियेदरम्यान वापरलेले पाणी गढूळ, मातीयुक्त किंवा अशुद्ध होते. त्यामुळे उत्पादन बाहेर काढण्यापूर्णी शुद्ध व स्वच्छ पाण्याने शेवटी धुतले जाण्याची सोय असते.

निचरा – धुतलेल्या फळे व भाज्या बाहेर पडत असताना त्यातील पाणी जास्तीत जास्त निचरा होईल, अशी जाळीदार व्यवस्था केलेली असते.

सुकवणे – फळे व भाज्या अधिक कोरडी करण्यासाठी हवेच्या प्रवाहाचाही वापर केला जातो.

**मुख्य वैशिष्ट्ये :**

उत्पादन फिरत राहते आणि प्रत्येक बाजू पूर्णपणे स्वच्छ होते. पाण्याच्या जेटद्वारे उत्पादनावरील धूळ, चिखल आणि अशुद्धता काढल्या जातात.

उत्पादनाच्या पृष्ठभागावरील चिकट घाण प्रभावीपणे स्वच्छ केली जाते.

अन्न प्रक्रिया उद्योगासाठी सुरक्षित आणि टिकाऊ. मोठ्या प्रमाणावर फळे व भाज्या धुण्यास मदत होते. फळे व भाज्या पूर्ण स्वच्छ होतात, त्यामुळे आरोग्यास सुरक्षित असतात. कमी पाणी वापर हाताने धुण्यापेक्षा पाण्याची बचत होते. कमी मानवी हस्तक्षेपामुळे उत्पादनाची गुणवत्ता चांगली राहते. विविध प्रकारच्या फळे आणि भाज्यांसाठी उपयुक्त. मोठ्या अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी उपयुक्त. सफरचंद, संत्री, आंबे, लिंबू, बटाटे, गाजर, रताळे, बीट यासाठी होतो वापर.

# मोसंबी फळगळीची विविध कारणे आणि योग्य उपाय

**मोसंबीच्या अंबिया बहाराची फळगळ ही एक मोठी समस्या मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसमोर मागील पाच वर्षांपासून निर्माण झाली आहे. फळगळ होण्याची विविध कारणे आहेत आणि त्यावर उपाय सुद्धा आहेत. त्याची माहिती करून घेतल्यास याचा चांगला फायदा होतो.**



**वनस्पती शास्त्रीय आंतरिक फळगळ** : पावसाळ्यात जमिनीत सतत पाणी साचून राहल्याने झाडाच्या मुळया कुजतात, मुळ्यांना प्राणवायू अल्प किंवा मिळत नसल्याने फळांवर त्यांचा परिणाम होऊन ती पिवळी होऊन गळून पडतात.

**बुरशीजन्य फळगळ** : बुरशीजन्य फळगळ प्रामुख्याने फायटोप्थोरा, कोलेटोट्रीकम, डिप्लोडिआ व ऑल्टरनेरिया या बुरशीमुळे होते. या बुरशीचे संक्रमण फळांवर होऊन आर्थिक नुकसानकारक फळगळ आढळून येते.

**किटकजन्य फळगळ** :

फळझाडांवर प्रादुर्भाव करणाऱ्या फळमाशी तसेच रस शोषक पतंगामुळे फळगळ दिसून येते.

**असे करा एकात्मिक व्यवस्थापन** : शेतातील पाणी बाहेर काढावे, पाणी साचून राहिल्यास बागेमध्ये तणनाशकाचा वापर टाळावा. गळून पडलेल्या फळांना खोल खड्यात दाबून त्यांची विल्हेवाट लावावी. एनएए १ ग्रॅम (१० पीपीएम) किंवा २–४ डी* १.५ ग्रॅम (१५ पीपीएम) किंवा जिब्रेलिक ॲसिड १.५ ग्रॅम (१५ पीपीएम) सह एन एटीसीए (४) (१० पीएम) १ ग्रॅम + ब्रासिनोलाइड (४ पीपीएम) ०.४ ग्रॅम + फॉलिक ॲसिड (१०० पीपीएम) १० ग्रॅम + १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून १५ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. सूक्ष्म अन्नद्रव्ये झिंक सल्फेट ५ ग्रॅम, फेरस सल्फेट १ ग्रॅम व बोरॉन १ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन अंबिया फळांकरिता ऑगस्ट– सप्टेंबर महिन्यात तसेच मृगाच्या फळाकरिता ऑक्टोबर–नोव्हेंबर मध्ये फवारणी करावी.

**बुरशीजन्यरोगापासून होणारी फळगळ व्यवस्थापन :**

फायटोफ्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज ब्राऊन रॉट' चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फोसिटिल एएल'' २.५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. तसेच या द्रावणांची फवारणी करीत असताना वाफ्यात सुद्धा यांची जमिनीवर फवारणी करावी. बुरशीनाशकाचे द्रावण टाकल्या नंतर ५ दिवसांनी १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व १०० ग्रॅम सुडोमोनास १ किलो शेणखतात मिसळून प्रति झाड देण्यात यावे. कोलेटोट्रीकम बुरशीजन्य फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी २.५ ग्रॅम किंवा अझोक्सस्ट्रोबिन + डायफेनकोणाझोल १ मिलि प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

**किटकजन्य फळगळ व्यवस्थापन** : फळ हिरव्या रंगामधून पिवळसर रंगामध्ये रूपांतर होत असताना १०–१५ दिवसाच्या अंतराने फळ तोडणी होईपर्यंत ५ टक्के निंबोळी अर्क (५०० ग्रॅम/१० लिटर पाणी) किंवा निंबोळी तेल (नीम ऑइल) १० मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळमाशीच्या नरांना आकर्षित करण्याकरिता फळमाशी सापळे प्रति हेक्टरी २५ याप्रमाणात ऑगस्ट महिन्याच्या दुसर्या आठवड्यापासून किंवा तोडणीच्या साधारण २ महिने आधीपासून बागेत झाडांवर टांगून ठेवावेत. साधारणतः सायंकाळीच्या वेळी बागेच्या बांधावर गवत पेटवून धूर करावा. रसशोषण करणाऱ्या पतंगाकरिता विषारी आमिषे तयार करुन बागेत ठेवावे. याकरिता २० ग्रॅम मॅलॅथिऑन ५० ईसी २० मिली + २०० ग्रॅम गूळ + खाली पडलेल्या फळांचा रस (४०० ते ५०० मिलि) २ लिटर पाण्यात मिसळून प्रत्येकी दोन आमिषे रूंद तोंडाच्या पसरट भांड्यात टाकून २५ ते ३० झाडामध्ये १ याप्रमाणे लटकुन ठेवावेत.

# शाश्वत पीक उत्पादनासाठी मृद व जलसंधारण

**राज्यातील एकूण लागवडी योग्य जमिनी पैकी ८० टक्के शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर म्हणजेच निसर्गावर अवलंबून आहे. या कोरडवाहू (अवर्षण प्रवण) भागातील पावसाच प्रमाण कमी, अनियमित आणि लहरी असल्यामुळे पीक उत्पादन हे अनिश्चित स्वरूपाचे असते. या कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांचा विचार केल्यास, त्यांना आपली शेती हि निसर्गाच्या लहरीप्रमाणे करावी लागते आणि म्हणूनच कोरडवाहू क्षेत्रातील पिकांचे नियोजन करताना उत्पादन वाढीच्या दृष्टीने विविध सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करण गरजेचे आहे.**



अवर्षण प्रवण क्षेत्रातील पावसाचा अभ्यास केला तर अस दिसून येते कि या भागात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी, (सरासरी ५०० ते ७५० मि.मी. पेक्षा कमी) पाऊस हा अनिश्चित, लहरी, बेभरवशाचा आणि प्रतिकूल असतो. सर्वसाधारणपणे जून–जुलै मध्ये पाऊस सुरु होतो. जुलै–ऑगस्ट मध्ये पावसाचे प्रमाण घटते आणि त्याचबरोबर तो अनिश्चित असतो. सप्टेंबर महिन्यात म्हणजे उत्तरा व हस्त नक्षत्रा मध्ये सर्वात जास्त म्हणजे १५० ते २०० मि.मी.पाऊस पडतो. चित्रा नक्षत्रात म्हणजेच ऑक्टोबरच्या मध्यानंतर पाऊस पूर्णपणे थांबतो म्हणून या भागातील ७० टक्के क्षेत्र रब्बी पिकाखाली असते आणि त्यापैकी ८० टक्के क्षेत्रावर शेतकरी रब्बी ज्वारीची पेरणी करतात. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांसाठी ओलावा साठविण्याच्या दृष्टीने खरीप हंगामातील ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब न थेंब जमिनीत, जिरवणे, मुरविणे आणि साठविणे अत्यावश्यक आहे. या जमिनीत मुरलेल्या पावसावरच रब्बी पिकांचे उत्पादन अवलंबून आहे.त्यासाठी खरीप हंगामात पडलेल्या पाऊस जमिनीत कसा मुरविता येईल हे शेतकऱ्यांनी पाहिले पाहिजे.

**सपाट वाफे** : कोरडवाहू शेतीमध्ये जेथे पाणी मुरण्याचा वेग जास्त आहे आणि जमिनीला फारसा उतार नाही अशा ठिकाणी उतारला आडवे वाफे तयार करावेत.वाफे तयार करतांना प्रथम कुळवाची पाळी द्यावी. त्यानंतर बळीराम नांगराने उभे – आडवे ६ मीटर ६ मीटर अंतरावर उतारास आडवे सपाट वाफे तयार करावेत. वरंब्याची उंची साधारणपणे २० ते ३० से.मी. ठेवावी. असे वाफे जागोजागी पाणी मुरविण्यास मदत करतात. त्यामुळे जमिनीमध्ये नेहमीपेक्षा ५० टक्के जास्त ओल साठवली जाते. या पद्धतीमुळे रब्बी ज्वारीचे हेक्टरी उत्पादन २ ते ३ क्विंटल पर्यंत वाढल्याचे आढळून आले आहे.

**सरी वरंबे** : मध्यम ते भारी जमिनीत खरीप हंगामात बळीराम नांगराने उतारास आडवे तास घालावेत. त्यामुळे सऱ्या तयार होतात आणि पडणाऱ्या पावसाचे पाणी सऱ्या मधून जमिनीत मुरते. या पद्धतीत ८० टक्क्यापर्यंत पाणी जमिनीत मुरते. जमिनीतून पाणी वाहून जात नाही.सऱ्यांची लांबी ९० मीटर पर्यंत ठेवावी.या पद्धतीमुळे उत्पादनात ३५–४० टक्के वाढ दिसून आली आहे.

**बंदिस्त सरी वरंबे** : या पद्धतीत मुख्य वरंबे उतारास आडवे ठेवावेत तर बंदिस्त वरंबे उतारच्या दिशेने ठेवावेत.अशा रीतीने उताराला आडवे बंदिस्त सरी वरंबे तयार होतात.मुख्य वरंब्याची लांबी ६ मीटर व उंची ३० से.मी.ठेवावी. तर बंदिस्त वरंब्याची उंची २० से.मी. व दोन वरंब्यातील अंतर ३ मीटर ठेवावे. या पद्धतीत जास्त पाऊस पडला तरी बंदिस्त वरंबे फुटून संथ गतीने पाणी शेतातून बाहेर जाते. ही पद्धत कोरडवाहू भागात चोपण व क्षारयुक्त जमिनीत पाणी मुरविण्यासाठी उपयुक्त असून त्यामुळे जमिनीतील विद्राव्य क्षारांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

**जैविक बांध** : समपातळीत उतारास आडवे मातीचे बांध टाकण्याऐवजी वनस्पतींची अंजन, खस गवत आणि सुबाभूळ अशा वनस्पतींची निवड करावी. गवतांचे ठोंब किंवा बी समपातळीत उताराला आडवे दोन ओळीत पावसाळ्याच्या सुरुवातीस लावावे. दोन ओळीत ३० से.मी. अंतर ठेवावे.दोन रोपातील अंतर १५ ते २० से.मी. ठेवावे.जैविक बांधामुळे वाहून जाणाऱ्या पाण्यास अडथळा निर्माण होऊन पाण्याचा वेग कमी केला जातो. जमिनीची धूप कमी होते.गवती बांधामुळे जनावरांना चारा मिळतो.सुबाभूळीच्या जैविक बांधाची उंची ३० से.मी ठेवून कापलेल्या कोवळ्या फांद्याचा जनावरांना वैरण म्हणून किंवा जमिनीत गाडल्यास हिरवळीचे खत म्हणून उपयोग होतो.दोन जैविक बांधामुळे ह्या कोवळ्या फांद्या कापून टाकल्यास त्याचा धूप प्रतिबंधक म्हणून उपयोग होतो व सेंद्रिय कर्बाचे प्रमाणही वाढते.त्याद्वारे रब्बी पिकांमध्ये प्रती हेक्टरी २५ ते ५० किलो नत्राची बचत करता येते. जैविक बांधामुळे उत्पादनात २० ते २५ टक्के वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

**समपातळीत लागवड व मशागत :**

जमिनीचे सपाटीकरण, नांगरणी, कुळवणी, कोळपणी यासारख्या मशागती व पेरणी समपातळीत पण उताराच्या आडव्या दिशेने कराव्यात. त्यामुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होतो.पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते.वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचा वेग कमी केला जातो आणि धुपीस आळा बसतो. कोळपणी व खुरपणीमुळे जमिन भुसभुशीत होते. भेगा कमी प्रमाणात पडतात. त्यामुळे जमिनीतील भेगांमधून बाष्पीभवनाद्वारे होणाऱ्या पाण्याचा ऱ्हास कमी होतो.जमिनीत ओलावा जास्त काळ व जास्त प्रमाणात साठविला जातो. मशागतीमुळे तणांचा नाश होऊन ताणांमुळे कमी होणारा ओलावा वाचून दीर्घकाळ पिकास उपयोगी पडतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६१ : प्रिन्स सेसी या शास्त्रज्ञाने प्रथमच दुर्बिणीसाठी टेलिस्कोप ही संज्ञा वापरली.

१६६५ : सुप्रसिद्ध पुरंदरच्या वेढ्यामधे दिलेरखान पठाणने वज्रमाळ किल्ला जिंकला.

१७३६ : चिमाजीअप्पांनी मोघल बादशहाचा हस्तक जंजिरा येथील सिद्दीसाताचा पराभव करुन मराठी सत्तेचा दरारा बसविला.

१८६५ : जॉन विल्कस बूथने अब्राहम लिंकनवर गोळी झाडली. लिंकन दुसर्या दिवशी मृत्यू पावला.

१९१२ : आर.एम.एस. टायटॅनिकची हिमनगाशी टक्कर. बोटीला भगदाड पडून बुडु लागली.

१९४४ : मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर महाभयानक विस्फोट. ३०० ठार. त्याकाळच्या २ कोटी पाउंडचे नुकसान.

१९४४ : मुंबई गोदीत उभ्या असलेल्या 'फोर्ट स्टिकिन' या मालवाहू जहाजावर दुपारी ४ वाजुन ५ मिनिटांनी भीषण स्फोट होऊन ३०० जण ठार झाले आणि (त्याकाळच्या) सुमारे २ कोटि पौंडा इतके आर्थिक नुकसान झाले.

१९८६ : बांगलादेशमध्ये १ किलो वजनाच्या अतिप्रचंड गारांचा वर्षाव. ९२ ठार. गारांच्या वजनाचा हा विक्रम अजुन अबाधित आहे.

१९९५ : टेबल टेनिसमधे सलग ६,६७० रॅलीज करण्याचा जागतिक विक्रम डॉ. रमेश बाबू यांनी पुण्यात नोंदवला.

२००८ : भारतातील कोलकत्ता व बांगलादेशाची राजधानी ढाका या दोन देशादरम्यान रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.

२०१० : पश्चिम बंगाल, उडीसा, झारखंड आणि बिहार राज्यात आलेल्या चक्रवर्ती वादळामुळे सुमारे १२३ लोकांचे निधन झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२९ : क्रिस्टियन हायगेन्स डच गणितज्ञ, खगोलविद्? आणि पदार्थवैज्ञानिक, लंबकाच्या घड्याळाचा शोध (मृत्यू: ८ जुलै १६९५)

१६७५ : छत्रपती शिवाजी महाराज यांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम भोसले यांच्या दुसऱ्या पत्नी राणी ताराबाई भोसले यांचा जन्मदिन.

१८३३ : व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता रॉस लोव्हिस मंगल्स व्हीसी यांचा जन्मदिन.

१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणार्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (मृत्यू: ६ डिसेंबर १९५६)

१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार.

१८९८ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारमधील प्रसिद्धी व प्रचार प्रमुख सुब्बीर अप्पादुराई यांचा जन्मदिन.

१९०७ : भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभिक नेते व माजी सरचिटणीस पूरणचंद जोशी यांचा जन्मदिन.

१९१४ : शांता हुबळीकर अभिनेत्री (मृत्यू: १७ जुलै १९९२)

१९१९ : शमशाद बेगम पार्श्वगायिका (मृत्यू: २३ एप्रिल २०१३)

१९२२ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९८९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (मृत्यू: १८ जून २००९ सॅन अन्सेल्मो, कॅलिफोर्निया, यू. एस. ए.)

१९२७ : द. मा. मिरासदार विनोदी लेखक (मृत्यू: )

१९३३ : सर्जनशील कला अकादमीचे संस्थापक–प्राचार्य अनिल कुमार दत्ता यांचा जन्मदिन.

१९४२ : मार्गारेट अल्वा केंद्रीय मंत्री व राजस्थानच्या राज्यपाल

१९४३ : रामदास फुटाणे वात्रटिकाकार

१९५७ : भारतीय मल्याळम स्त्रीवादी लेखिका आणि नाटककार के. सरस्वती अम्मा यांचा जन्मदिन.

१९५७ : भारतीय अवकाश वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष तसचं, विक्रम साराभाई स्पेस सेंटर आणि लिक्विड प्रोपल्शन सिस्टम सेंटरचे माजी संचालक कैलासावादिव शिवन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५० : भारतीय तत्त्ववेत्ते योगी रमण महर्षी तथा वेंकटरमण अय्यर समाधिस्थ झाले. चैत्र व. १२ शके १७८३ (जन्म: ३० डिसेंबर १८७९)

१९६२ : सर मोक्षगुंडम्? विश्वेश्वरैया, भारतीय अभियंता.

१९६२ : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंते, विद्वान, मुत्सद्दी आणि मैसूर संस्थानचे दिवाण

१९६३ : केदारनाथ पांडे तथा राहूल सांकृतायन इतिहासकार (जन्म: ९ एप्रिल १८९३)

१९९७ : चंदू पारखी चित्रपट आणि नाट्य अभिनेते (जन्म:)

१९९८ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, छायाचित्रकार व पटकथालेखक नितीन बोस यांचे निधन.

२०१३ : राम प्रसाद गोएंका उद्योगपती (जन्म: १ मार्च १९३०)

# गव्हाची काढणी करताना नुकसान टाळण्यासाठी घ्या काळजी

सध्या गहू उत्पादक राज्यात गव्हाची काढणी सुरू आहे. एप्रिल महिन्यात शेतकरी गव्हाची काढणी करतात. अनेक ठिकाणी गव्हाची काढणी सुरू झाली आहे, तर काही ठिकाणी काढणीची प्रतीक्षा सुरू आहे. उशिरा काढणी केल्यास या वेळी गव्हाचे अधिक उत्पादन मिळू शकते, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला. दिल्लीच्या कृषी शास्त्रज्ञांनी गव्हाची लागवड करणाऱ्या शेतकर्यांसाठी गहू कापणीच्या संदर्भात महत्त्वाचा सल्ला दिला आहे. गहू कापणीच्या संदर्भात पुसा शास्त्रज्ञाने प्रसिद्ध केलेला सल्ला मध्ये त्यांनी असे सांगितले आहे की शेतकर्यांनी सकाळची वेळ गहू काढणीसाठी सर्वात योग्य वेळ आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सकाळी गव्हाची काढणी करावी. गव्हाची कापणी हाताने केली जात असेल तर पिकाचा गुंडाळा ३ ते ४ दिवस शेतातच सोडावा जेणेकरून ते सूर्यप्रकाशात सुकल्यांनंतर त्यातील ओलावा कमी होईल. शेतकऱ्यांनी एप्रिल अखेरपर्यंत सर्व प्रकारच्या गव्हाची कापणी करावी. ज्या शेतकऱ्यांना विळी किंवा कापणी यंत्राच्या सहाय्याने गव्हाचे पीक काढायचे आहे त्यांनी हे लक्षात ठेवावे की कापणी करताना गव्हाचे पीक पृष्ठभागापासून ४ ते ५ सें.मी. उंचीवर कापावे. पीक कापताना दाण्याचा आवाज येत असेल तर समजून घ्या की पीक काढणीसाठी पूर्णपणे तयार आहे. या पद्धती द्वारे पीक काढणीसाठी तयार आहे की नाही हे शेतकरी सहजपणे ओळखू शकतात.

## थोडक्यात



### प्राचार्य भ.कि.सबनीस यांच्या स्मृतीदिनी अभिवादन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने संस्थापक भ.कि.सबनीस यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष बालासाहेब मसने म्हणाले की स्व.प्राचार्य सबनीस सरांच्या विचारांना एक दिशा होती दृष्टी होती त्याचप्रमाणे सामाजिक समतेचे उद्दिष्ट ठेवून त्यांनी महाविद्यालयाचा विद्यार्थ्यांचा विकास केला सर्व कर्मचाऱ्यांच्या अर्थिक अडचणी, समस्या सोडविल्या जाव्यात यासाठी कर्मचारी पतसंस्थेची स्थापना केल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे सचिव राजू साळवी,उपाध्यक्ष आर. एन.कदम,कोषाध्यक्ष सर्पमित्र डॉ.राजकुमार थोरात,प्रा.एन.एन. रेखावार,ए.व्ही.देशपांडे, प्रा.पतकवार,व्ही.व्ही. चौसाळकर आदी उपस्थित होते.

जयहिंद ग्रुपच्या वतीने वृक्षारोपण

स्व.प्राचार्य भ.कि. सबनीस यांच्या स्मृती दिना निमित्त जयहिंद ग्रुपच्या वतीने यो.शि. संस्था परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी यो.शि.संस्थेचे सल्लागार प्रा.एम.एस.लोमटे, प्रा.नारायण गोळेगावकर,संचालक लंकेश वैद्य,मेजर एस. पी.कुलकर्णी,रमेशचंद्र सोनटक्के,प्रा.रमेश सोनवलकर,उपप्राचार्य डॉ.जितेंद्र देशपांडे,प्रा.डॉ.भोसले भागवत मसने,प्रा.सागर कुलकर्णी आदी उपस्थित होते. मान्यवरांनी स्व.प्राचार्य सबनीस यांनी स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात अनेक वर्ष प्राचार्य पदावर काम केले. त्यांच्या प्राचार्य पदाच्या काळात नव्या शैक्षणिक क्रांतीची सुरुवात झाली. अतिशय शिस्तप्रिय व शैक्षणिक दृष्टिकोन असलेले व्यक्तीमत्व म्हणून प्राचार्य स्व.भ.कि. सबनीस यांची ख्याती होती अशा शब्दात अनेकांनी भावना व्यक्त केल्या व अभिवादन केले.

### पाटोदा शहरात महात्मा जोतिराव फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**पाटोदा । प्रतिनिधी**

थोर समाज सुधारक महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंती निमित्त पाटोदा शहरातील संत सावता माळी चौकात सकाळी दहा वाजता अभिवादन कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला शहरातील जेष्ठ नागरिक,पाटोदा नगरपंचायतचे नगरसेवक, सभापती,व्यापारी, डॉक्टर,वकिल,पत्रकार तसेच फुले प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महात्मा फुले यांनी शोषित, उपेक्षित आणि दुर्लक्षित समाजाच्या हक्कासाठी आयुष्यभर लढा दिला. स्त्रीशिक्षण, जातीअंत, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समतेसाठी दिलेला त्यांचा लढा हा अखंड मानवतेच्या उद्धारासाठी होता.या प्रसंगी अनेक मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या कार्यावर भाष्य केले आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले जयंती उत्सव समिती पाटोदा यांनी केले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सभापती संदीप जाधव यांनी केले तर आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार नगरसेवक तथा सभापती रामेश्वर गोरे यांनी मानले.

# अंबाजोगाईकरांनी केला क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीराव फुले जयंतीनिमित्त स्मारक निर्मितीचा संकल्प

## प्रबोधनाची प्रक्रीया गतिमान करण्यासाठी महापुरुषांची स्मारके आवश्यक – उद्घाटक डॉ.राजेश इंगोले यांचे प्रतिपादन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील माळीनगर परिसरात शुक्रवारी महात्मा ज्योतीराव फुले यांची १९८ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.मधुकरराव इंगोले यांनी इथे सोसायटी स्थापन करीत असतानाच येथे महात्मा फुले यांच्या कार्याला उजाळा मिळावा म्हणून येथे स्मारक व्हावे याकरिता जागा राखून ठेवली होती. त्याबाबत रीतसर प्रक्रिया करून या जागेवर महात्मा फुले स्मारक बनवावे याकरिता त्यांनी प्रयत्न केला होता. महात्मा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त येथे जयंती साजरी करीत असताना या ठिकाणी महात्मा फुले स्मारक निर्मितीचा संकल्प परिसरातील सर्व नागरिकांनी व्यक्त केला. यावेळी या विचारपीठावर कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा अंबाजोगाई नगरपरिषदेचे माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बुद्धीष्ट इंटरनेशनल स्कुलचे रत्नदीप गोरे, अंबाजोगाईचे पीएसआय ज्ञानेश्वर कांबळे तर व्याख्याते म्हणून व्याख्याते म्हणून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे हेमंत धानोरकर,







बाळासाहेब मसने, पत्रकार प्रा.गोविंद जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला महात्मा फुले स्मारकाच्या नाम फलकाचे अनावरण उदघाटक डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले, छत्रपती शाहुजी महाराज, घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्ज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या उदघाटकीय भाषणात बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करणे हे मुलाचे आद्यकर्तव्य असते. माझ्या वडिलांनी ही सोसायटी करतांना इथे महात्मा फुले स्मारक असावे हे स्वप्न पाहिले होते आणि त्यासाठी येथे जागेची तजबीजही करून ठेवली होती. मध्यंतरात त्यांची प्रकृती स्थिर नसल्याने त्यांना या स्मारकाच्या निर्माणाबाबत काही कार्यवाही करता आली नाही याची खंतही त्यांनी मला बोलताना अनेकदा व्यक्त केली होती. परंतु, त्यांच्या या स्वप्नाला सत्यात उतरविण्यासाठी आता मी पूर्ण ताकदीने प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी येथे उपस्थितांना दिली. हे स्मारक भव्य दिव्य असेल आणि हे स्मारक महात्मा फुले यांच्या ऐतिहासिक कार्याला सतत उजाळा देत राहील आणि समाजाला प्रेरणा देत राहील याची काळजी ही स्मारक समिती घेणार असल्याचे सांगितले. महापुरूषांची स्मारके ही तर त्यांच्या कार्याची प्रतीके असतात त्यामुळे ती उभारली गेलीच पाहिजे, कारण ही प्रतीके समोर असतील तरच त्या कार्याची आठवण राहते आणि समाजात सामाजिक प्रबोधनाची प्रक्रिया गतिमान राहते असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. जगातील सर्वोत्तम गुरू शिष्याचं नातं कोणतं होत तर ते महात्मा फुले आणि घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच होत कारण महात्मा फुले या गुरूच सामाजिक न्यायाच, समतेच, बंधुतेच प्रत्येक स्वप्न त्यांच्या सर्वोत्तम शिष्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्ण केलं अस प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी केले. यावेळी बोलतांना प्रा.किरण चक्रे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकत हे स्मारक सामाजीक क्रांतीच प्रतीक म्हणून उभं राहिलं अस मत व्यक्त केले. यावेळी हेमंत धानोरकर यांनी महात्मा फुले यांचे न उलगडलेले अनेक पैलू, अप्रकाशीत असे सामाजिक कार्य याची नाविन्यपूर्ण माहिती उपस्थितांना दिली. पत्रकार प्रा.गोविंद जाधव यांनी महात्मा फुले हे क्रांतीचे अजब रसायन होते. त्यांनी स्रियांना, शेतकऱ्यांना, दीन दलितांना बळ देण्याचं काम आयुष्यभर केले असे गौरवोद्गार काढले. बी.के.मसने यांनी महात्मा फुले स्मारक निर्मिती ही सर्वांनी लवकरात लवकर करण्यासाठी प्रयत्न करावेत याकामी डॉ.राजेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वजण ताकदीने काम करूयात आणि हे स्मारक निर्मितीचे कार्य तडीस नेवूयात असे आश्वासन दिले आणि महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलतांना रत्नदीप गोरे यांनी महापुरूष हे कोण्या एका जातीचे नसतात. तर ते संपूर्ण समाजाचे असतात त्यांचे कार्य सगळ्या समाजाला उद्धारण्याचे काम करत असतात. महात्मा फुले स्मारक बनवण्यासाठी डॉ.राजेश इंगोले यांनी पुढाकार घेतला, सहकार्याची भावना ठेवली भविष्यात त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे भव्य स्मारक निर्मितीसाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे यांच्यासह प्रा.अनिल नरसिंगे, ओव्हाळ यांची समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार वैभव कदम यांनी मानले. यावेळी समस्त महात्मा फुले प्रेमींच्या वतीने या स्मारक निर्मिती बाबत सकारात्मक भूमिका घेऊन पुढाकार घेतल्याबद्दल डॉ.राजेश इंगोले यांचा सहृदय सत्कार करण्यात आला.

# तिंतरवणीत महंत बालाजी महाराज यांच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

**फुलसांगवी । प्रतिनिधी**

**गेल्या आठ दिवसापासून सुरू असलेल्या तिंतरवणीतील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज श्रीराम संस्थानचे मठाधिपती महंत बालाजी महाराज शेंडगे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. या कीर्तनानंतर हजारो भाविक भक्तांनी या ठिकाणी महाप्रसादाच्या पंगतीचा लाभ घेतला.**



शिरूर कासार तालुक्यातील तिंतरवणी येथे चैत्र पौर्णिमा हनुमान जयंती, श्री.संत वामनभाऊ महाराज व संतश्रेष्ठ भगवान बाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठादिनानिमित्त गेल्या आठ दिवसापासून मोठ्या उत्साही वातावरणामध्ये अखंड हरिनाम सप्ताह व गीत रामायणाचा कार्यक्रम पार पडत होता. सप्ताह दरम्यान या ठिकाणी अखंडरित्या काकडा भजन,श्रीमद्? भगवद्गीता विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम महाराज गाथा भजन, गीत रामायण, हरिपाठ कीर्तन व हरी जागर असे नित्यनेमाने कार्यक्रम पार पडत होते. अगदी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये चालू असलेल्या सप्ताहाला गावातील भाविक भक्तांनी अन्नदानाच्या मोठ्या पंगती दिल्या. या पंगतीचा भाविक भक्तांसह गावकऱ्यांनी ही लाभ घेतला. गेल्या आठ दिवसापासून सुरू असलेल्या या सोहळ्याची सांगता आज तिंतरवणी येथील श्रीराम संस्थानचे मठाधिपती महंत बालाजी महाराज शेंडगे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. या सांगतेच्या कार्यक्रमासाठी हभप भाऊसाहेब महाराज खेडकर, बंडू महाराज जरांगे, तीर्थराज महाराज धस, आदिनाथ महाराज जरांगे,अंकुश महाराज खेडकर, डॉ. किसन महाराज खेडकर, अमोल महाराज अंकुश, सोमनाथ महाराज अंकुश, नवनाथ महाराज कापरे भीमराव खेडकर, अशोक अंकुश आदी टाळकरी वृंदांसह महाराष्ट्र पोलीस पाटील असोसिएशन राज्य अध्यक्ष महादेव नागरगोजे माजी सरपंच डॉ.उद्धव खेडकर, पिंटू शेठ खेडकर, डीएम खेडकर सर, पत्रकार गोरख तात्या खेडकर, गोविंद खेडकर शाहिनाथ बिडवे आदींसह मोठ्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती होती. या सांगतेच्या कीर्तनानंतर आलेल्या भाविक भक्तांना ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाची पंगती देण्यात आली आहे या पंगतीचा भाविकांनी मोठ्या श्रद्धेने लाभ घेतला.

## पाटोदा पोलिस स्टेशनमध्ये शांतता कमिटीची बैठक संपन्न



**पाटोदा । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता पाटोदा शहर व पोस्ट हद्दीतील शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीस जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, सदस्य,तसेच परिसरातील विविध प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. यावेळी जयंती उत्सव शांततेत, सुसंघटित व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा व्हावा यासाठी महत्त्वाच्या सूचना व मार्गदर्शन करण्यात आले.बैठकीत खालील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली मिरवणुकीचा मार्ग, वेळ आणि शिस्तबद्ध आयोजन

पोलीस बंदोबस्ताची तयारी व सुरक्षा यंत्रणा

ध्वनिप्रदूषण नियमांचे पालन करण्याचे आवाहन

तसेच जातीय सलोखा व सामाजिक ऐक्य जपण्यावर भर स्वच्छता, पाणी व्यवस्था व सार्वजनिक ठिकाणांची योग्य देखभाल या विषयावर चर्चा झाली. या बैठकीस पोलीस निरीक्षक तसेच सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हनुमान जयंतीनिमित्त महासांगवी येथे रक्तदान शिबिर यशस्वीपणे संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील महासांगवी या गावामध्ये हनुमान जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून अनेक तरुणांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली सामाजिक बांधिलकी जपली.

हे शिबिर हनुमान जयंती उत्सव समितीच्या वतीने जिल्हा रुग्णालयात बीड येथील रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते आणि युवक मंडळांचे सहकार्य लाभले.



या शिबिरात एकूण १०१ युवकांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन श्री अन्नपूर्णा देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित यांची मोलाची भूमिका राहिली. गावातील सर्व स्तरातील नागरिकांनी शिस्तबद्धरीत्या सहभाग नोंदवत हनुमान जयंतीचे औचित्य सामाजिक कार्यात रूपांतरित केल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## आदित्य शिक्षण संस्थेत २१० जणांचे मोफत मोतीबिंदू निदान, नेत्र तपासणी

बीड । प्रतिनिधी

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य संघटनेच्या वतीने १ ते ७ एप्रिल हा आठवडा जागतिक अंधत्व जागृती सप्ताह म्हणून साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक ७ एप्रिल सोमवार रोजी आरोग्य दिनानिमित्त मोफत मोतीबिंदू निदान व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व आदित्य हॉस्पिटल यांच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिरात सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत

तब्बल २१० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून मोतीबिंदूचे निदान करण्यात





### आरोग्य दिनानिमित्त आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचा उपक्रम

आले. कार्यक्रमाचे उद्घाटन आदित्य दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिमांशू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा हे उपस्थित होते. व्यासपीठावर आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आंबाजोगाईतील नेत्र तज्ज्ञ डॉ. कोमल शर्मा, आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. विनोद राहिंज,डॉ. प्रगती राख, डॉ. मोहिते, डॉ. नागरे, डॉ. शिंदे, डॉ. अमोल मार्कंड, रामेश्वर ढोबळे, रुग्णालय इन्चार्ज शशिकांत काळे यांची उपस्थिती होती. यावेळी अंबाजोगाईतील प्रसिद्ध नेत्रविकार तज्ज्ञ डॉ. कोमल शर्मा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, आदित्य शिक्षण संस्थेने गोरगरीब लोकांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन खूप छान प्रकारे केले. त्याबद्दल कौतुक व्यक्त केले. त्यांना निमंत्रित केल्याबद्दल आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका आदिती सारडा आणि संस्थेचे त्यांनी आभार मानले. त्या म्हणाल्या आदित्य हॉस्पिटल मध्ये सर्व अत्याधुनिक उपकरणे असल्यामुळे तपासणी करणे सोपे झाले. याचा रुग्णांना मोठा फायदा होत आहे. डॉ. विवेक कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य कसे सुधारावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रगती राख यांनी केले. आभार शशिकांत काळे यांनी मानले. आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व आदित्य हॉस्पिटल यांच्या वतीने रुग्णांना दर्जेदार सुविधा पुरवल्या जात आहेत. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून येथील डॉक्टर विद्यार्थी सेवा करत असल्याने रुग्णांची विश्वासहार्ता वाढत असल्याचे मोफत तपासणी शिबिराचा २१० रुग्णांनी घेतलेल्या लाभावरून दिसून येत आहे.

# पदवी प्रमाणपत्रासोबतच जबाबदारी स्विकारा

## वैष्णवी महाविद्यालयात पदवी वितरण सोहळ्यात पत्रकार अशोक निपटे यांचे आवाहन

**वडवणी । प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण हे आई वडिलांच्या कष्टातुन आलेल्या पैशातून होत असते. पदवी प्रमाणपत्र आपल्या आई–वडिलांच्या घामातून तयार झालेलं प्रमाणपत्र असल्याचे भान विद्यार्थिनी ठेवावे. त्यामुळे विद्यार्थी बांधवांनी पदवी प्रमाणपत्र स्वीकारताना आपल्या कुटुंबाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आपण आता एक कर्ते व्यक्ती म्हणून समोर आलं पाहिजे. आपलं कुटुंब गाव आणि देशासाठी आपलं योगदान राहिलं पाहिजे असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अशोक निपटे यांनी केले.**

वडवणी येथील साहेबराव मस्के पाटील शि. प्र. मंडळाच्या वैष्णवी महाविद्यालयात पदवी वितरण सोहळ्यामध्ये पत्रकार अशोक निपटे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैष्णवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर श्यामसुंदर गुळभिले तर प्रमुख पाहुणे म्हणून वडवणीचे तहसीलदार संजय जिरंगे अण्णा, महाविद्यालयाचे सर्वेसर्वा डॉ. रणजीत मस्के, पेशकार राहुल शेटे, मंगेश बुचुडे, एमडीएलचे संपादक ओमप्रकाश साबळे यांचीही उपस्थिती होती. पुढे बोलताना पत्रकार अशोक निपटे यांनी सांगितले की पूर्वीच्या



काळी पदवीला खूप महत्त्व होतं. लग्न जुळवताना देखील पदवी शिक्षण म्हटलं की त्याला खूप महत्त्व असायचं. मात्र सध्या पदव्यांचे ढिगारे निर्माण होऊ लागले आहेत. कितीही शिक्षण घेतलं तरी शासनाकडे नोकऱ्या नाहीत मात्र शिक्षण हे केवळ आता नोकरीसाठी राहिलेलं नाही तर शिक्षणातून आपल्या जीवनाला दिशा देता आली पाहिजे. पदवीचे शिक्षण घेतलं म्हणजे त्या व्यक्तीला मतदानाचा एक जास्तीचा अधिकार वाढतो तशा जबाबदाऱ्या देखील वाढतात. उच्चशिक्षित असल्यामुळे कुटुंबासोबतच गाव आणि देशाची जबाबदारी देखील त्याच्यावर येते. आतापर्यंत आई–वडिलांच्या कष्टावर जगणारा तो व्यक्ती आता स्वावलंबी झाला पाहिजे. शिक्षणाचा उपयोग त्याने नोकरी नाही मिळाली तरी कुटुंबाला आधार कसा मिळेल यासाठी केला पाहिजे. आपल्या अंगातील कला गुण तपासून त्याला वाव दिला पाहिजे. आपल्या बुद्धी कौशल्याचा उपयोग हा आपल्या कामासाठी केला पाहिजे आणि त्यातून आपल्या आई–वडिलांना आधार दिला पाहिजे. सध्या स्पर्धा खूप वाढल्यामुळे आलेल्या परिस्थितीचा अभ्यास करून त्या परिस्थितीला तोंड देण्याची भूमिका ही पदवीधारकांनी घेतली पाहिजे. उपलब्ध संधी त्यातून आपला मार्ग सापडून त्यामध्ये यश कसे मिळेल यासाठी त्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. हे करत असताना आपण निर्व्यसनी राहिले पाहिजे. निर्व्यसनी राहिलं तरच त्याचा समाजावर एक आदर्श निर्माण होईल आणि त्यांनी घेतलेल्या जबाबदाऱ्या तो योग्य पद्धतीने पार पाडू शकेल असे पत्रकार निपटे यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. श्यामसुंदर गुळभिले यांनी प्रस्ताविकातून आपल्या महाविद्यालयातील विविध उपक्रमाची माहिती दिली. तर तहसीलदार संजय जिरंगे, राहुल शेटे यांनी विद्यार्थ्यांसाठी प्रशासन नेहमी सहकार्याची भावना ठेवून काम करेल अशी ग्वाही दिली. यावेळी डॉ. रणजीत मस्के यांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापक बांधवांचे कौतुक केले. यशस्वीतेसाठी प्राचार्य शामसुंदर गुळभिले, प्रा. बाळासाहेब राजमाने, प्रा. सचिन खिस्ते, प्रा. कैलास होके, प्रा.गणेश शित्रे, प्रा. रेखा चौधरी प्रा.गणेश दुबाले, प्रा. धनंजय खोसे, प्रा. लक्ष्मण चव्हाण, प्रा. परमेश्वर शेंडगे, प्रा.मुंजाजी सोळंके, प्रा. सतीश फुन्ने, प्रा.अनंत आवटे यांनी परिश्रम घेतले.

### मोबाईलचा अतिवापर टाळावा...

**पदवीधारकांनी आपल्या जबाबदारीचे भान ठेवावं रात्री उशिरापर्यंत मोबाईलवर वेळ वाया न घालवता त्या मोबाईलचा योग्य वापर करून समाजामध्ये एक आदर्श निर्माण कसा होईल या दृष्टीने प्रयत्न करावा कारण समाज पदवीधारकांकडे चांगल्या नजरेने पाहत असतो समाजाची ही चांगली नजर आपल्यावर कायम राहिल याची काळजी पदवीधारकांनी घेतली पाहिजे असेही पत्रकार निपटे यांनी सांगितले.**

cmyk

राज्य लोकतंत्र

रविवार, दि.१३ एप्रिल २०२५ | ६

# पिंपळवंडी येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी कोणी जागा देता का जागा

## नवीन इमारत बांधकामासाठी आला ५८ लाखांच्या वर निधी

पिंपळवंडी । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत १५ व्या वित्त आयोगातून बीड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या बळकटीकरणासाठी नवीन इमारत बांधकामासाठी २२ कोटी ४० लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे.बीड जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघातील आरोग्य केंद्र,उपकेंद्र इमारतीसाठी निधी उपलब्ध करण्यासाठी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी विशेष पाठपुरवठा केला याबद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.तसेच पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे अनेक वर्षापासून प्राथमिक आरोग्य उपकेंद्र अल्पशा जागेत थाटलेले

**पिंपळवंडी येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळेची भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा म्हणून तालुक्यात एकमेव शाळा म्हणून एक वर्षापूर्वी निवड झालेली आहे.करोडो रुपयेचा यासाठी निधी आहे.दोन एकर क्षेत्रात भव्य- दिव्य सुशोभीत इमारत व भव्य क्रीडांगणासह सर्व शालेय सुविधांचा यामध्ये समावेश आहे.या शाळेमुळे पिंपळवंडीच्या वैभवात भर पडणार आहे.**

आहे.याही उपकेंद्राला खासदार बजरंग सोनवणे यांच्या पाठपुराव्यामुळे व प्रयत्नाने नवीन इमारत बांधकामासाठी ५८ लाख २७५ रुपये निधी उपलब्ध झाला आहे.या निधीतून आरोग्य उपकेंद्राची भव्य इमारत उभारली जाणार आहे या शंकाच नाही.परंतु,या नवीन वास्तूसाठी या ठिकाणी जागा उपलब्ध करणे सर्वात महत्त्वाचे ठरणार आहे. यासाठी संबंधित प्रशासन व ग्रामस्थांचे प्रयत्न व सहकार्य महत्त्वाचे असून सर्वांनी मिळून जागेचा प्रश्न मार्गी लावणे कसरतीचे काम आहे. कारण यापूर्वी याच उपकेंद्राला तसेच पशुवैद्यकीय दवाखान्याच्या नवीन इमारत बांधकामासाठी निधी मंजूर होऊनही इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध न झाल्याने निधी परत गेल्याचा प्रकार घडलेला आहे.आताही जागे अभावी निधी परत जाणार नाही व चांगल्या सुविधे पासून ग्रामस्थ वंचित राहणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घेऊन जागेची समस्या सोडवणे सर्वांचेच कर्तव्य आहे.बीड लोकसभा मतदारसंघातील नागरिकांना उत्तम आरोग्यसेवा मिळावी यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र,उपकेंद्र तसेच हेल्थ युनिटच्या स्वतंत्र आणि मजबुत इमारती असण्याची गरज लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रयत्नाने खासदार बजरंग सोनवणे यांनी भरघोस निधी खेचून आणला व सामान्य गोरगरिबांना दिलासा देण्याचे कार्य केले आहे.तसेच ते लिंबादेवी फाटा-निरगुडी-डोंगरकिन्ही-पिंपळवंडी-अंमळनेर-डोईठाण-धामणगाव-दौलावडगाव-अहिल्यानगर या नवीन राष्ट्रीय महामार्गासाठी प्रयत्नशील आहेत व पाठपुरावा करीत आहेत.

# शेतकरी कर्जमाफीसाठी प्रहारचे आ.सोळंकेंच्या घरासमोर टेंभे आंदोलन



माजलगाव । प्रतिनिधी

महाविकास आघाडीने निवडणूक घोषणा पत्रात जाहीर केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे या व इतर मागण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चु कडू यांच्या आदेशाने माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रकाश सोळंके यांच्या घरासमोर दि १२ एप्रिल शनिवार रोजी टेंबे आंदोलन करण्यात आले

महाविकास आघाडीने विधानसभा निवडणुकी दरम्यान सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊ असे आश्वासन दिले होते परंतु सत्तेवर आल्यानंतर ते पाळले जात नाही म्हणून शेतकऱ्याची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे, शेतकऱ्यांचा मालाला हमीभाव मिळालाच पाहिजे, पेरणी ते कापणी हे कामे एम.आर.जी. एस प्रमाने झालेच पाहिजे व दिव्यांग बांधवांना ६०००/प्रती महिना झालाच पाहिजे या मागणीसाठी अधिवेशनात आवाज उठवण्यासाठी संपूर्ण राज्यभरात आमदाराच्या घरासमोर टेंबे आंदोलन करण्यात आले या आंदोलनाचा एक भाग म्हणून माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या घरासमोर हातात टेंबा मशाल, गळ्यात निळा दुपट्टा,व हातात भगवा झेंडा घेऊन टेंबे आंदोलन करण्यात आले.

या टेंबे आंदोलनात माजलगाव प्रहारचे तालुका प्रमुख गोपाल पैंजणे,धारूर तालुका प्रमुख हनुमान तोंडे, नितीन कांबळे, भारत डोंगरे,विजय जोगडे,अशोक अर्जुन,लक्ष्मण गरड,महादेव डाके, अनिल देशमुख, कपिल आडागंळे,व अनेक पदाधिकारी व शेतकरी सहभागी झाले होते

# तहसील कार्यालयातून चोरट्याने संगणक लांबवला

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील तहसील कार्यालयातील महसूल विभाग दोन मधील संगणक चोरीला गेलेला आहे. एक एप्रिल रोजी नायब तहसीलदाराच्या तक्रारीवरून पाटोदा पोलिसात अज्ञात विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रशासनाने तहसील मध्ये झालेल्या चोरीचा प्रकार उघड होऊ नये म्हणून प्रयत्न केले शासकीय कार्यालय ही आता चोरापासून सुरक्षित नसल्याचे समोर येत आहे. तहसील मधील नायब तहसीलदार गणेश गोविंद दहिफळे यांच्या महसूल विभाग दोन व स. गा. यो.चा पदभार आहे. दुपारी दोन वाजता दहिफळे त्यांच्या महसूल दालनात पोहोचले असता त्यांच्या दालनातील संगणक. गायब असल्याचे दिसून आले. दहिफळे यांनी तहसीलदार डीबी निळवाड यांच्या ही बाब लक्षात आणून दिली कार्यालयात सर्वत्र चौकशी आणि पाहणी केली मात्र संगणक आढळून आला नाही दहिफळे यांनी चाळीस हजार रुपयांचा पान ३ वर

# वाचाळवीर कृषीमंत्री माणिकराव कोकाटेवर कारवाई करा - गणेश बजगुडे

**बीड । प्रतिनिधी**



कृषीप्रधान राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे वारंवार आपल्या आकलेची मुक्ताफळे उधळत हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत असुन त्यांच्या शेतकरी विरोधी वक्तव्याचा निषेध व्यक्त करत त्यांच्यावर तत्काळ कारवाई करण्याची मागणी काँग्रेसचे नेते तथा शिवक्रांती संघटनेचे अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केली आहे.

जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा हवालदिल असताना कधी निसर्गाचा लहरीपणा तर कधी सरकारचा जुलमिपणा यामध्ये कायम होरपळला जात आहे. निवडणुकीच्या काळामध्ये शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफी व शेतमालाल हमी भाव देण्याचे खोटे आश्वास देवुन सत्तेत बसलेल्या सरकारच्या नेत्यांना शेतकऱ्यांशी काहीही देणेघेणे राहिलेले दिसत नाही. अद्याप पर्यंत शेतकऱ्यांच्या हिताचा कोणताही निर्णय हे सरकार घेवु शकले नाही. याउलट राज्याचे कृषिमंत्री मोहदय वारंवार शेतकरी विरोधी वक्तव्य करुन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहेत. ''कर्जमाफीच्या पैशातून शेतकरी साखरपुडा, लग्न लावतात. कांद्याचा भाव पडायला शेतकरीच जबाबदार आहेत.'' यासारखे वक्तव्य करुन आपल्या आकलेचे तारे तोडणाऱ्या माणिकराव कोकाटे यांच्यावर तत्काळ कारवाई करण्यात यावी. त्याच बरोबर शेतमालाला हमीभाव व शेतकरी कर्जमाफी करण्याची मागणी काँग्रेसचे नेते व शिवक्रांती संघटनेचे अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केली आहे.



**बीड : शहरातील सहयोगनगर परिसरातील पवनसुत हनुमान मंदिर येथे श्री हनुमान जन्मोत्सवनिमित्त आ.संदीप क्षीरसागर उपस्थित राहून दर्शन घेतले. येथील मंदिराच्या सभामंडपाचे काम आमदार फंडातून पूर्ण झाल्याबद्दल मंदिर कमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी परिसरातील सर्व नागरिक उपस्थित होते.**



**बीड : स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने अभिवादन करताना माजी मंत्री प्रा. सुरेश नवले शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले माजी नगरसेवक शुभम धूत, साखरे, अब्बड आधी दिसत आहेत.**

# माजलगावात सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने भिम जन्मोत्सव- लाईट शो व हँगींग डिजे मुख्य आकर्षण

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरामध्ये सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने भिम जन्मोत्सवाचे आयोजन दि. १४ एप्रिल २०२५ रोजी सायं. ५.०० वाजता करण्यात आले असुन लाईट शो व हँगींग डिजे मुख्य आकर्षण असणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन जयसिंह सोळंके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांची उपस्थिती असणार आहे. सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, शिवाजी रांजवण, चंद्रकांत शेजुळ, रोहन घाडगे, राहुल लंगडे, विजय शिंदे, अविनाश बनसोडे, अच्युत लाटे, रविकांत राठोड, बालसाहेब सोळंके, सुशिल डक यांचेसह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन सह्याद्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, कोषाध्यक्ष नारायण शेजुळ, सचिव प्रशांत शेटे, कार्याध्यक्ष दिलीप झगडे, जयंती अध्यक्ष प्रशांत प्रधान, उपाध्यक्ष सचिन जाधव, सचिव निखील घाडगे यांनी केले आहे.

# देवाजी कांबळे यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आदर्श शिक्षक देवाजी मारूती कांबळे यांचे शुक्रवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बोरूळा तलाव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



सोमनाथ बोरगाव येथील येथील रहिवासी तथा जुन्या पिढीतील आदर्श शिक्षक देवाजी मारूती कांबळे (वय ८० वर्षे) यांचे अंबाजोगाई येथे शुक्रवार, दिनांक ११ एप्रिल रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पान ३ वर

# जयभीम महोत्सवात चित्रकला स्पर्धा उपक्रम

## नवोदित चित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने शनिवार (दि.१२) रोजी महापुरुष भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या चित्रकला स्पर्धेला अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त शिक्षण संचालक शशिकांत हिंगोणीकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून



उप शिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, अधिकक्षक शालेय पोषण आहार तुकाराम पवार, शिक्षण विस्तार अधिकारी भगवान सोनवणे, सूर्यकांत जोगदंड, अनिल डोंगरे, लक्ष्मीकांत अवढाळ, राजेंद्र खेडकर आदी उपस्थित होते. या भव्य चित्रकला स्पर्धेचे प्रास्तविक विजयकुमार समुद्रे, सूत्रसंचालन सुमेध जोगदंड,सुनिल डोंगरे, प्रा.अशोक गायकवाड यांनी मानले. दरम्यान जयभीम महोत्सवात आयोजित कार्यक्रमांस जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

सामाजिक न्याय भवन येथे पार पडलेल्या महापुरुष चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण, वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, पुरुषोत्तम वीर, विशाल सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

# एक लाख इंग्रजी वाक्य लिहीणाऱ्या श्रेया पूनम ढोलेचे कौतुक!

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**संघर्षभूमीवर १ एप्रिल पासून १४ दिवसीय भीमजयंती महोत्सव सुरू आहे. या महोत्सवात आई सेंटरचे प्रो चे संचालक प्रा.सर नागेश जोंधळे यांचे ज्ञानाचे प्रतीक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असलेला तरूण, समाज व देश या विषयावर उपस्थितांमध्ये चैतन्य निर्माण करणारे व्याख्यान संपन्न झाले. याप्रसंगी आई सेंटर प्रो च्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा विशेष सत्कार करण्यात आला.**

सर्व सत्कारार्थींचा गुलाब पुष्पगुच्छ व भारतीय संविधानाची प्रत व देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रा.राहुल सुरवसे, ॲड.दिलीप गोरे, राणी जोगदंड, रूपेश जोगदंड व प्रा.सुनिल वाघमारे यांचा



सत्कार करण्यात आला. तसेच विश्वविक्रमवीर लेखक तथा प्रेरणादायी वक्ते सर नागेश जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली केवळ दोन महिन्यांतच इंग्रजीतील दैनंदिन जीवनात वापरात येणाऱ्या एक लाख वाक्य लिहिण्याचा व बोलण्याचा विक्रम करणाऱ्या इयत्ता अकरावीतील श्रेया पूनम ढोले यांचाही संविधान ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच यूपीएससीची परीक्षा देऊन जिल्हाधिकारी बनण्यासाठीचे स्वप्न बाळगणाऱ्या मान्यवरांनी व उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात शुभेच्छा दिल्या. यावेळी ॲड.शाम तांगडे, भारत सातपुते, डॉ.इंद्रजीत भगत, डॉ.मकरंद जोगदंड, सचिन आंबाड, डॉ.किर्तीराज लोणारे व सविता लोणारे यांच्या हस्ते या गुणवंतांचा गौरव करण्यात आला. या गुणगौरव कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.नागेश जोंधळे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सुभाष घाडगे यांनी मानले.

**ध्येय प्राप्तीसाठी जिद्द, चिकाटी व सातत्य आवश्यक :**

आपणांस डॉक्टर व्हायचे असो वा, इंजिनीअर, क्लास वन वा, सुपर क्लास वन अधिकारी, व्यावसायिक वा उद्योजक आपण पाहिलेली स्वप्न पूर्ण करण्यासाठी व ध्येयप्राप्तीसाठी जिद्द, चिकाटी, सातत्य व आपणांस योग्य दिशा आवश्यक असते. यासोबतच ती दिशा दाखवणारा गुरू व आपल्याकडून त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालण्यासाठीची मानसिकता ठेवल्यास आपणास उत्तुंग असे यश प्राप्त करता येते. कु.श्रेया पूनम ढोले यांनी इंग्रजीतील एक लाख वाक्य लिहिण्याचा जाणीवपूर्वक सराव करीत असताना घेतलेला पुढाकार (इनिशिएटिव्ह), जिद्द व सातत्य हे खूप वाखण्याजोगे आहे. अकरावीतील श्रेया ही करू शकते तर आपणही हे नक्कीच करू शकता.

– सर नागेश जोंधळे

# खरबुजाचे भाव घसरले! २३ रुपयावरून थेट १२ रुपयांवर, शेतकरी आर्थिक संकटात

## शेती परवडणार कशी?मसेवाडी येथील दत्ता मोरे यांचा सवाल



लिंबागणेश । प्रतिनिधी

खरबुजाच्या बाजारभावात लक्षणीय घसरण झाली आहे.पंधरवड्यापुर्वी २३ रूपये किलो असलेला भाव आज दि.१२ एप्रिल रोजी १२ रुपये किलोपर्यंत खाली आला आहे.यामुळे शेतकऱ्यांना खरबुज लागवडीवर झालेला खर्च वसूल करणे अवघड झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. उन्हाळ्यात थंडावा देणारे फळ म्हणून पान ३ वर

### लागवडीवरील खर्च निघणं अवघड

बीड तालुक्यातील बालाघाटावरील मसेवाडी येथील खरबुज उत्पादक शेतकरी दत्ता मोरे यांनी ३ एकर कुंदन वाणाच्या खरबुजाची लागवड केली. महिनाभरापूर्वी दीड एकर खरबूजाची विक्री करण्यात आली.तेव्हा २३ रुपये किलो भाव मिळाला. ऐन रमजानच्या शेवटच्या आठवड्यात निम्याने भाव कोसळले. कडक उन्हाळ्यात शेततळ्याचे पाणी देऊन कष्टाने आलेल्या खरबुज उत्पादनाचा खर्च सुद्धा निघणं अवघड झालंय.आम्ही घरचं ५ माणसं रानात राबणारे,खरबुज काढण्यासाठी ३०० रूपये मजुरीने आणलेले मजुर आणि कोसळलेले भाव त्यामुळे शेतकऱ्यांला कसं परवडणार अशी खंत शेतकरी दत्ता मोरे यांनी बोलून दाखवली.

-दत्ता मोरे (खरबुज उत्पादक शेतकरी मसेवाडी ता.बीड)

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आज निघणार जय भीम पदयात्रा

**बीड । प्रतिनिधी**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासन तसेच शैक्षणिक संस्था, एनएसएस, नेहरू युवा केंद्र, एनसीसी यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या जय भीम पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे.**



ही पदयात्रा सकाळी ७.३० वाजता जिल्हा क्रीडा कार्यालय येथून सुरू होणार असून ती शहरातील मुख्य मार्गावरून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत जाणार आहे. या पदयात्रेचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ होणाऱ्या कार्यक्रमाने होणार आहे हा कार्यक्रम सकाळी ८.३० वाजता होईल.

सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना उन्हाळ्याचा त्रास होऊ नये यासाठी विविध प्रकारची खबरदारी घ्यावी असे निर्देश उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी यासंदर्भात आयोजित एका बैठकीत दिले.

बैठकीला शिक्षणाधिकारी माध्यमिक,शिक्षण अधिकारी तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी आणि समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना व एनसीसी चे समन्वयक उपस्थित होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त पूर्ण राज्यात १३ एप्रिल रोजी याच प्रकारच्या पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# विदेशी पर्यटकाबरोबर गैरवर्तन करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा; विविध संघटनांची मागणी



**खडकवासला । प्रतिनिधी**

विदेशी पर्यटकाबरोबर गैरवर्तन करणाऱ्यांचा तातडीने शोध घ्यावा. आणि त्यांच्यावर कडक कारवाई करावी. सिंहगड गडाचे पावित्र्य राखण्याची मागणी विविध संघटनांनी केली. हवेली पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांना निवेदन देऊन गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली.

समाज माध्यमावर व्हिडीओ पाहण्यात आला. न्यूझीलंडचा पर्यटक पायवाटेने सिंहगडावर जात असताना, वरुन खाली उतरणाऱ्या सुमारे १० जणांच्या समुहातील काही तरुणांनी त्याच्या मराठी भाषा अज्ञानाचा फायदा घेत काही घाणेरड्या शिव्या उच्चरायला लावल्या.

तसेच इतरही काही अश्लील शब्द बोलायला लावले. आणि त्याच्या तोंडून येणाऱ्या त्या शब्दांवर ते विकृतपणे हसून, त्याची मजा घेत होते. हा व्हिडीओ मध्ये ही मुलं छत्रपती संभाजीनगर येथील असावीत असे दिसते. त्यांच्या सोबत काही मुलीही दिसत आहेत.

हा न्यूझीलंडचा पर्यट यु ट्यूबर ही आहे. सिंहगडासारख्या ऐतिहासिक, पवित्र ठिकाणी घडलेली ही घटना सम्पूर्ण महाराष्ट्रालाच नव्हे, तर भारतालाही बदनामीकारक ठरणारी आहे. हा पर्यटक त्याच्या देशात हा प्रसंग सांगेल तेव्हा किती गैरसमज पसरणार आहेत.

आपल्या देशाबद्दल, याची या तरुणांना कल्पना संस्कृतीचं माहेरघर असणाऱ्या शहराजवळच्या पवित्र सिंहगडावर घडलेला हा प्रसंग सर्वच शिवभक्तांमध्ये प्रचंड चीड आणणारा आहे. आज हजरो पर्यटक सिंहगडावर येत असतात. त्यात अशा हौश्या गौश्या, विकृत मनोवृत्तीच्या लोकांमुळे ही पवित्र स्थळं, आपला देश बदनाम होत असतो. आमची निवेदनद्वारे आपणास नम्र विनंती आहे, की शिवभक्तांचा वाढता रोष लक्षात घेता, या प्रसंगातील सर्वच तरुणांना लकरात लवकर अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. तसेच सिंहगडावर येणाऱ्या ट्रेक रूटवर अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी पोलीस खात्याचा काही बंदोबस्तही असावा. अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रसंगी सर्वप्रथम गड पावित्र्य मोहीम व सिंहगड परिवाराच्या वतीने इतिहास संशोधक डॉ. नंदकिशोर मते, नितीन वाघ, किरण पाटील, ऍड. प्रकाश केदारी, बाळासाहेब मंडलिक, आशिष पार्टे, वेद बुटाला यांनी निवेदन दिले. शिवसेनेच्या वतीने विभागप्रमुख नितीन वाघ, महेश पोकळे, संघटक तानाजी गाढवे, केतन शिंदे, महेश विटे, कल्पेश वाजे, आकाश कुमावत यांनी निवेदन दिले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे खडकवासला मतदारसंघाचे विभाग अध्यक्ष विजय मते, चंदन कड, राहुल वाळुंजकर, अंगराज भिसे, बाळासाहेब हनमघर, बाळासाहेब मंडलिक उपस्थित होते.'राष्ट्रवादी' गडकिल्ले संवर्धन सेलचे प्रदेशाध्यक्ष योगेश शेलार यांनी हवेली पोलिस दिले. प्रदेश उपाध्यक्ष समीर धुमाळ, पश्चिम विभाग अध्यक्ष मनोज भोसले, पुणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव उपस्थित होते.

# कोर्हाळे घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी-डॉ. गोर्हे

**बारामती । प्रतिनिधी**

गावच्या यात्रेपूर्वी माझ्याशी लग्न कर, अन्यथा तुझ्या आई-वडिलांचे मुंडके कोयत्याने उडवेन, अशी धमकी दिल्याने बारामती तालुक्यातील कोर्हाळे खुर्द येथे १६ वर्षीय अल्पवयीन मुलीने तरुणांनी दिलेल्या त्रासामुळे आत्महत्या केली. यावर विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोर्हे यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली.

आजही आपल्या समाजात अशा घटनांमुळे अल्पवयीन मुलींना सुरक्षित वातावरणात जगता येत नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे मत डॉ. गोर्हे यांनी व्यक्त केले.

डॉ. गोर्हे म्हणाल्या, अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीची भूमिका बजावली पाहिजे. मुलींना कोणताही त्रास, छेडछाड अथवा धमकी दिली जात असेल, तर त्यांनी कोणतीही भीती न बाळगता



११२ या पोलिस हेल्पलाइन क्रमांकावर तातडीने संपर्क साधावा.

महिला सहायता संस्था जसे की, स्त्री आधार केंद्र यांच्याकडे संपर्क साधून मदत घेता येईल. पालकांनीही मुलींच्या वागण्यात कोणतेही भावनिक वा मानसिक बदल जाणवले, तर त्याकडे दुर्लक्ष न करता त्यांच्याशी संवाद साधावा. सुरक्षितता, भावनिक आधार आणि समजुतदारपणाची गरज असलेल्या अशा प्रसंगांमध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. या घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. समाजात अशा अमानुष वागणुकीला थारा नाही. आपली जबाबदारी आहे की अल्पवयीन मुलींना सुरक्षित, सन्मानजनक आणि निर्भय आयुष्य मिळावे, असे मत डॉ. गोर्हे यांनी व्यक्त केले.

मुख्य आरोपीला अटक; चार दिवसांची पोलिस कोठडी

अल्पवयीन मुलीला दिलेल्या त्रासातून तिने आत्महत्या केल्याने वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात चौघांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल झाला आहे. त्यातील मुख्य आरोपी विशाल दत्तात्रय गावडे याला वडगाव निंबाळकर पोलिसांनी अटक केली. त्याला बारामती न्यायालयापुढे हजर करण्यात आले. नयायालयाने त्याला १५ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. गुन्हा दाखल झालेले प्रवीण नामदेव गावडे, शुभम सतीश गावडे व सुनील हनुमंत खोमणे हे तिघे अद्याप फरार आहेत. यासंबंधीचा तपास सुरू असल्याची माहिती वडगावचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन काळे यांनी दिली.

# महानंद डेअरीविरोधात वरवंडकर करणार आत्मक्लेश; दिलेला शब्द न पाळल्याचा आरोप

**दौंड । प्रतिनिधी**

वरवंड (ता. दौंड) येथील ग्रामस्थांनी महानंद दूध डेअरी भुकटी प्रकल्पाविरोधात पुन्हा एकदा आंदोलनाचा पवित्रा हाती घेतला आहे. येथील ग्रामस्थ आता थेट प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांच्या वाकडेवाडी-पुणे येथील विभागीय कार्यालयासमोर २४ एप्रिल रोजी आत्मक्लेश उपोषण करणार असल्याची माहिती उपोषणकर्ते संग्राम दिवेकर यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की, वरवंड येथील महानंद दूध डेअरीच्या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर अक्षम्य वायू, ध्वनिप्रदूषण होत आहे. या दूध भुकटी प्रकल्पाकडून प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांच्या अटी व शर्ती यांचे पालन होत नाही. प्रकल्पाकडून नियमबाह्यपणे कोळसा साठवून ठेवण्यात आला आहे.

या कोळशापासून परिसरात भविष्यात आग लागण्याची दाट शक्यता आहे.





महानंदकडून ईटीपी यंत्रणा सक्षमपणे कार्यान्वित नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून सातत्याने होत असलेल्या प्रदूषणास आळा घालण्यात यावा, या हेतूने प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांना अनेकदा निवेदन दिली आहेत. मात्र, कुठलीच ठोस भूमिका उचलली नसल्याने वरवंड ग्रामस्थांनी २७ फेब्रुवारी रोजी महानंद डेअरीच्या गेटवर मागण्या पूर्ण करण्यासाठी उपोषण केले होते.

दरम्यान, त्याच दिवशी या प्रकल्पांच्या अधिकार्यांनी एक महिन्याच्या आत आम्ही कोळसा या इंधनाऐवजी ब्रिकेट या इंधनाचा वापर करू व प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने घालून दिलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करू, अशी लेखी हमी पत्राद्वारे ग्रामस्थांना दिली होती. असे न झाल्यास आम्ही आमचा प्लांट बंद ठेवू, असे पत्रात नमूद करण्यात आले होते.

परंतु जवळपास दीड महिन्याचा कालावधी उलटून गेला असून, आमच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम महानंद व्यवस्थापनाने केले आहे. ही आमच्या संपूर्ण वरवंडकरांची फसवणूक आहे. या सगळ्याचा जाहीर निषेध करण्यासाठी व प्रदूषण महामंडळाच्या वेळकाढूपणाच्या कारभाराविरोधात आम्ही आत्मक्लेश उपोषण करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती उपोषणकर्ते संग्राम दिवेकर यांनी दिली.

# पुण्यातील बेपत्ता तरुणीचा मृतदेह भीमा नदीपात्रात विच्छिन्न अवस्थेत; तरुणासोबत दुचाकीवर जातानाचे सीसीटीव्ही समोर

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पुण्यातील राजगुरुनगर येथून बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलीची हत्या झाल्याची धक्कादायक बातमी समोर येत आहे. महाविद्यालयात जाते म्हणून सांगून गेलेली तरुणी कालपासून बेपत्ता होती. मात्र आज तिचा मृतदेह भीमा नदीपात्रात सापडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. महाविद्यालयातून ही तरुणी एका तरुणासोबत दुचाकीवरून गेल्याचे सीसीटीव्ही फुटेज सापडल्याने तरुणीचा खून झाल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलीस तपासात पिडित अल्पवयीन मुलीच्या डोक्यात अन तोंडावर गंभीर दुखापत असल्याचं आढळलं.



दुचाकीवरून घेऊन जाणारा तरुण नेमका कोण? अल्पवयीन मुलीची हत्या नेमकी कोणी अन का केली? याचा तपास खेड पोलीस करतायेत.( झींपश उीळाश)

नक्की काय झाले?

पुण्यातील राजगुरुनगर येथील महाविद्यालयीन तरुणी काल बेपत्ता झाली होती. मात्र आज या महाविद्यालयीन तरुणीचा मृतदेह भीमा नदीपात्रात आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पीडित तरुणीचा मृतदेह मांजरेवाडी येथे भीमा नदीच्या पात्रात आढळला असून पोलीस तपासात तरुणीचा खून झाल्याचे उघड झाले आहे. महाविद्यालयात गेलेली मुलगी गावातील एका तरुनसोबत दुचाकीवरुन गेल्याचे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहे. काल गायब झालेल्या या अल्पवयीन मुलीचा मृतदेह आज भीमा नदी पात्रात आढळल्यानं खळबळ उडाली होती. यावरून ही हत्या असल्याचा अन पुरावे नष्ट करण्याच्या हेतूने नदीत फेकून दिल्याचा अंदाज आहे. तरुणी बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या आई-वडिलांनी नोंदवल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्री फिरवली. तरुणीचा शोध घेत असताना भीमा नदी पात्रात एका तरुणीचा मृतदेह असल्याचं स्थानिकांनी स्पष्ट केलं. पोलिसांनाही माहिती दिली त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जात तपास केला. या तपासांतर्गत तरुणीच्या डोक्यात व तोंडावर जबर मार व दुखापत झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केलं. तरुणीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पुण्यातील ससून रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. पीडित तरुणीचा खून झाल्याचा प्राथमिक अंदाज खेड पोलिसांनी वर्तवलाय.

# बांग्लादेशी मुलीला मैत्रिणीने बुधवार पेठेत ५ लाख रुपयांना विकले, अखेर कोठेवालीच्या अत्याचारातून 'अशी' झाली सुटका

**पुणे । प्रतिनिधी**

बांग्लादेशची सीमा बेकायदा ओलांडून मैत्रिणीबरोबर आलेल्या एका अल्पवयीन मुलीवर पुण्यात मोठी आपबीती ओढवली. या मुलीला मैत्रीणीनेच तीन लाख रुपयांना बुधवार पेठेतील एका कोठेवालीला विकले. यानंतर कोठेवालीने 'तु बांग्लादेशी असल्याचे पोलिसांना सांगून गुन्हा दाखल करेल' अशी धमकी देत तीला जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले. पाच महिण्यात झालेल्या अत्याचाराला वैतागून तरुणीने कशीबशी स्वत:ची सुटका करत पोलीस ठाणे गाठले. तीने दिलेल्या तक्रारीनूसार पाच महिलांवर गुन्हे दाखल झाले असून एका महिलेला फरासखाना पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार पिडीत मुलगी १६ वर्षे दोन महिण्यांची आहे. तीला बांग्लादेशातून मैत्रिणीने नोकरी आणि फिरण्याचे आमिष दाखवत पुण्यात आणले. यासाठी त्यांना बांग्लादेशातून नदीमार्गे बेकायदा भारतीची सीमा ओलांडली. पुण्यात आल्यावर त्या भोसरीमध्ये सात ते आठ दिवस राहिल्या. यानंतर तीच्या मैत्रिणीने तीला बुधवार पेठेत आणले. तीथे तीला एका महिलेला पाच लाखाच विकले.

यानंतर महिलेने तीला तुळशीबाग आणि बुधवार पेठेतील कोठ्यात ठेवले. तीला पोलिसांत देण्याची धमकी देत वेश्याव्यवसाय करण्यात भाग पाडले. पिडीतेला अत्याचार सहन होत नव्हते. मात्र तीला खोलीतून बाहेर पडू दिले जात नव्हते. पाच महिणे अत्याचार सहन केल्यावर तीने एकदा सुटकेचा प्रयत्न केला, मात्र तो असफल झाला. मात्र ती सात एप्रिलला कशीबशी खोलीतून बाहेर पडली.

तीने बस, रिक्षा पकडत हडपसर गाठले. तेथे हडपसर पोलीस ठाण्याची माहिती मिळताच तेथे धाव घेत तक्रार दाखल केली. हडपसर पोलिसांनी गुन्हा दाखल करत तो फरासखाना पोलिसांकडे वर्ग केला. याप्रकरणी फरासखाना पोलिसांनी पाच महिलांवर गुन्हा दाखल करत एका महिलेला अटक केली आहे. याप्रकरणाचा पुढील तपास तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे करत आहेत.

# क्रिप्टो करन्सीच्या आमिषाने पावणेदोन कोटींची फसवणूक; डॉक्टरचा जामीन अर्ज फेटाळला

**पुणे । प्रतिनिधी**

क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक केल्यास जास्त परतावा मिळेल, असे सांगून एक कोटी ७१ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणात एका डॉक्टरचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांनी हा आदेश दिला.

डॉ. मोहित मुकेश नागर (वय-४५, रा. इंदिरा कॉलनी, बनी पार्क, जयपूर, राजस्थान) असे जामीन फेटाळण्यात आलेल्या डॉक्टरचे नाव आहे. याबाबत बाणेर येथील ५४ वर्षीय डॉक्टरने चतुश्रृंगी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

फसवणूक झालेले डॉक्टर आणि आरोपी जयपूरमधील एकाच वैद्यकीय महाविद्यालयात शिकले होते. त्यामुळे त्यांची जवळची मैत्री झाली होती. आरोपी उपचारासाठी पुण्यात आला होता. त्याने फिर्यादी डॉक्टर आणि त्याच्या इतर मित्रांना डिजिटल चलनात गुंतवणूक केल्यास



जास्त परतावा मिळेल, असे सांगून एक कोटी ७१ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या गुन्ह्यात जामीन मिळण्यासाठी डॉ. नागर याने अर्ज केला होता. त्यास सरकारी वकील विशाल मुरळीकर यांनी विरोध केला. आरोपीला जामीन झाल्यास तो तपासासाठी हजर होण्याची शक्यता कमी आहे. या गुन्ह्याची व्याप्ती मोठी आहे.डॉ. नागर याने त्याच्या मुळ गावी सात कोटी रुपयाची मालमत्ता खरेदी केली आहे. या गुन्ह्याच्या सखोल तपासासाठी जामीन अर्ज फेटाळण्यात यावा, असा युक्तिवाद ड. मुरळीकर यांनी केला.


# रुग्णवाहिका व दुचाकीचा अपघात; एक ठार तर सहा जखमी

**तळेगाव ढमढेर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर महामार्गावर सणसवाडी येथे रुग्णवाहिका व दुचाकीच्या भीषण अपघातात रुग्णाचा नातेवाईक ठार तर सहा जण जखमी झाले. ही घटना गुरुवारी (दि. १०) रात्री सव्वादहा वाजेच्या सुमारास घडली.

रुग्णवाहिकाचालक फरार झाला असून शिक्रापूर पोलिस ठाण्यात याप्रकरणी सौरभ संतोष महाजन (रा. शिरूर) या रुग्णवाहिकाचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जगन्नाथ बबनराव खोपकर (वय ६१, रा. सोलापूर रोड, फातिमानगर, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

पुणे-अहिल्यानगर महामार्गावरून रुग्णवाहिका ही शिरूर येथील एका हॉस्पिटलमधील रमेश राठोड या रुग्णाला घेऊन भरधाव पुण्याच्या दिशेने जात होती. यावर सौरभ महाजन हा चालक होता. सणसवाडीनजीक मजाक कंपनीसमोर रुग्णवाहिका चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून रुग्णवाहिका समोरील दुचाकीला जोरात धडकून अपघात झाला. या अपघातात रुग्णवाहिकेतील रुग्णासोबत आलेला नातेवाईक सुमित बळीराम चव्हाण



(वय २८, रा. रांजणगाव गणपती, ता. शिरूर) हा जागीच ठार झाला, तर दुचाकी चालक गोविंद श्रीरंग पोळ, दुचाकीवर मागे बसलेला सूरज गणेश जगदाळे व रस्त्याच्या कडेला उभा असलेला ऋषिकेश गणेश जाधव (तिघेही रा. सणसवाडी, ता. शिरूर), रुग्णवाहिकेतील रुग्ण रमेश काशिनाथ राठोड, विकी रमेश राठोड व उषा रमेश राठोड (सर्व रा. रांजणगाव गणपती, ता. शिरूर) हे गंभीर जखमी झाले.

# तीर्थक्षेत्र विकासकामांची गुणवत्ता राखा - जिल्हाधिकारी डुडी

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी आराखड्यानुसार मंजूर असलेली सर्व कामे गुणवत्ता राखून तत्काळ पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्र विकास आराखडा संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी डुडी बोलत होते. तीर्थक्षेत्र विकासांतर्गत



छत्रपती संभाजी महाराज समाधी स्थळ, वढू बु. व तुळापूर, मालोजी राजे भोसले यांची गढी , श्रीक्षेत्र जेजुरी गड, सुदुंबरे येथील श्रीसंत जगनाडे महाराज समाधी स्थळ, हुतात्मा शिवराम हरी राजगुरू जन्मस्थळ परिसर विकास, अष्टविनायक गणपती मंदिराचा जीर्णोद्धार करणे श्रीक्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा या सर्व आराखड्यांच्या विकास कामांच्या प्रगती बाबत बैठकीत आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी डुडी म्हणाले की, तीर्थक्षेत्रांच्या विकास कामासंदर्भात मंदिर ट्रस्ट, संस्थान येथील स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन त्यांची मदत घेऊन कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत स्थानिक पातळीवरच्या काही अडचणी असतील त्या प्रशासनातर्फे सोडण्यात येतील, काही ठिकाणी जमीन संपादनासंदर्भात येणाऱ्या अडचणीसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांनी यात लक्ष घालून प्रक्रिया पूर्ण करावी. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांसाठीच्या आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा उत्कृष्ट असल्या पाहिजे, कामे पूर्ण झाल्यावर त्यांची देखभाल व दुरुस्तीसाठी समिती स्थापन करण्यात यावी असे त्यांनी सांगितले.

# येमाई देवीच्या पालखी सोहळ्यात पारंपरिक वाद्यांचा गजर

**कवठे येमाई । प्रतिनिधी**

सनईच्या सुमधुर सुरावर ढोल-ताशा, संबळ, डफ, झांज, लेझीम पथक यांसारख्या पारंपरिक वाद्यांचा गजर, आकर्षक रंगीबेरंगी फुलांनी सजवलेली पालखी, भंडाऱ्याची उधळण अन् 'अंबाबाईचा उदो उदो... जगदंबेचा उदो उदो'च्या जयघोषात मोठ्या भक्तिमय वातावरणात कवठे येमाई (ता. शिरूर) येथील श्री येमाई देवीचा पालखी सोहळा पार पडला.

कवठे येमाई येथील श्री येमाई देवीच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविकभक्त दरवर्षी हजेरी लावत असतात. नवसाला पावणारी कुलस्वामिनी म्हणून हे मंदिर प्रसिद्ध आहे. चैत्र पौर्णिमेनिमित्त दरवर्षी यात्रोत्सव मोठ्या जल्लोषात



साजरा केला जातो. शुक्रवारी (ता. ११) श्री येमाई देवी सभागृहापासून देवीला चोळी-पातळ वाजत-गाजत नेण्यात आले. गावापासून साधारण ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या देवीच्या मंदिरात शनिवारी (ता. १२) सकाळी अभिषेक व महापूजेने दिवसाची सुरुवात झाली. दरम्यान हनुमान जयंतीनिमित्त हनुमान चालिसा आणि भजनाचे आयोजन केले होते. त्यानंतर आकर्षक फुलांनी सजवलेली पालखी सनईच्या सुरावटीत आणि ढोल-ताशांच्या निनादात मंदिराकडे रवाना झाली.

गावातील विविध मंडळांनी पारंपरिक ढोल-लेझीम पथकाच्या साहाय्याने प्रात्यक्षिक सादर करत वातावरण अधिक रंगतदार केले. यावेळी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. 'अंबाबाईचा उदो उदो... जगदंबेचा उदो उदो'च्या जयघोषात आणि भक्तिभावाने अनवाणी पायांनी पालखी गावापासून मंदिरात नेण्यात आली. आरती व ओलांड्याने पालखी सोहळ्याची सांगता झाली.

यात्रेनिमित्त मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला आहे. मंदिराला आकर्षक रंगीबेरंगी फुलांनी सजविण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या यात्रोत्सवात पालखी मिरवणूक, ढोल-लेझीम स्पर्धा, दारू काम, बैलगाडा शर्यती, तमाशा आदी कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. रविवारी (ता. १३) चितपट निकाली कुस्त्यांचा जंगी आखाडा रंगणार आहे.

# डीपीजवळ कचरा जाळल्याने वीजपुरवठा खंडित, कारवाईचा इशारा



**वाघोली । प्रतिनिधी**

लोणीकंद परिसरात पुणे-नगर महामार्गालगत असलेल्या महावितरणच्या डीपी आणि मोरीमध्ये नागरिक कचरा टाकून तो जाळत असल्याने महावितरणच्या वायरिंगचे नुकसान होत आहे. यामुळे परिसरातील वीजपुरवठा काही तासांसाठी खंडित करावा लागत आहे. महावितरणने महापालिका आणि ग्रामपंचायतीला कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी सूचना दिल्या असून, नागरिकांना डीपी आणि एचटी लाईनजवळ कचरा टाकू नये, असे आवाहन केले आहे.

वाघोलीतील कोणत्याही डीपीजवळ कचरा टाकून तो जाळू नये. वीजपुरवठा खंडित झाल्यास महावितरण आणि मनपा अधिकाऱ्यांमार्फत कचरा टाकणाऱ्यांवर आणि जाळणाऱ्यांवर कारवाईसाठी पाठपुरावा करू, असे माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे यांनी सांगितले.